

१९९७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५४६९

# मराठी साहित्य दर्शन

१०

REFBK-0011985
REFBK-0011985

सौ. संजीवनी मराठे

अ.वि.गृह प्रकाशन पुणें

अ. वि. गृह प्रकाशन

३२८३३ वि: काव्य
क्रमांक १५८६ नों. दि. ८।१२।६

# मराठी साहित्य-दर्शन

## पुष्प दहावें : सौ. संजीवनी मराठे

★

संपादन व प्रस्तावना
प्रा. कु. सरोजिनी कुलकर्णी, एम्. ए.
... महाविद्यालय, पुणें २.

११८८५
REFBK-0011985

किमत दोन रुपये पन्नास नये पैसे

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

प्रकाशक :
**दि. दा. गांगल**, एम्.एस्सी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं,
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २

●

**प्रथमावृत्ति** :
**२६ ऑक्टोबर १९६१**
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

●

मुद्रक :
**दि. दा. गांगल**, एम्.एस्सी.
लोकसंग्रह छापखान्यासाठीं,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २.

[illegible] लखनऊ
अनुक्रम 39633 वि: .......
क्रमांक ....... पौ० वि: .......

# प्रकाशकाचें निवेदन

मराठी साहित्य-दर्शनाचें हें पुष्प वाचकांच्या हातीं देण्यांत आम्हाला धन्यता वाटत आहे. मराठी साहित्यांतील थोर लेखकांच्या वाङ्मयाचा परिचय थोडक्यांत करून द्यावा असा त्याच्या मागचा हेतु आहे. मराठींतील नामवंत साहित्यिकांचें विपुल लेखन अनेक ग्रंथांच्या द्वारें, मासिकें, साप्ताहिकें, वृत्तपत्रें व रेडिओ इत्यादि विविध माध्यमांच्या द्वारें प्रकाशित होत असतें. ग्रंथालयांत किंवा ग्रंथागारांत पाऊल टाकलें, की, एखाद्या लेखकाचींसुद्धा असंख्य पुस्तकें आढळून येतात. तेव्हा अशा स्थितींत कोणतें पुस्तक वाचूं व कोणतें नको, याचा संभ्रम माणसाला पडतो व त्यामुळे तो थोडासा गोंधळूनहि जातो. याशिवाय एखाद्या लेखकाच्या सर्व ग्रंथांचें वाचन व परीक्षण करणें प्रत्येक व्यक्तीला शक्य नसतें—निदान सध्यांच्या यांत्रिक-युगांत तेवढी सवडहि सर्व व्यक्तींना मिळतेच असें नाही. परंतु नामवंत लेखकाच्या सर्व वाङ्मय-प्रकारांचें दर्शन घडावें, ही इच्छा मात्र व्यक्तीच्या ठिकाणीं असते. अशा इच्छेची पूर्ति या मालेच्या द्वारें होईल अशी आम्हांस खात्री वाटते.

मराठींतील कांही नामवंत साहित्यिकांचा या दृष्टीने परिचय करून द्यावा, अशा हेतूने मालेचा प्रारंभ करण्यांत आला आहे. नामवंत साहित्यिकांच्या विपुल वाङ्मय-भांडारांतून निवडक व उत्कृष्ट, शिवाय त्यांत साहित्यिकाने लिहिलेले शक्यतों सर्व तऱ्हेचे वाङ्मय-प्रकार यावेत या हेतूने आम्ही संपादकांना विनंती केली व ती त्यांनी मान्य केली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. मराठी साहित्यप्रेमी वाचकांना ही माला अर्पण करून हें निवेदन पूर्ण करतों.

२० ऑक्टोबर १९६१

व्यवस्थापक,
अ. वि. गृह प्रकाशन, पुणें २.

# प्रस्तावना

कोणत्याहि लहानमोठ्या कवीच्या समग्र कवितेचा आस्वाद घेत असतांना व अभ्यास करतांना वाङमयाच्या प्रांतांतील कांही रहस्यं उलगडलीं जातात, कांही नव्यानं निर्माण होतात, तर जीं कांहीं गृहीतकृत्यं म्हणून आपण मानलेलीं असतात तींहि तशीं नाहीत, त्यांचाहि मागोवा पुन्हा घेतला पाहिजे असं वाटूं लागतं. हें रहस्यांत अडकणं आणि मोकळं झाल्यासारखं वाटणं हा वाङमयास्वादांतील एक अटळच भाग असावा.

अशी एकत्रित असलेली कविता कशी वाचली जात असावी हेंहि एक छोटंसं गूढच आहे. प्रत्येक रसिकाची कांही स्वतंत्र–वेगळी पद्धति असेल, पण कवीप्रमाणं रसिकाचाहि हा एक प्रवासच असतो. प्रत्येक कविता, मग ती सामान्य अगर अ-सामान्य असो थोडा वेळ गुंतवून ठेवते. त्या गुंतलेल्या अवस्थेंत कधीं त्या अनुभवाशीं, त्यांतील कवीच्या दृष्टीकोनाशीं रसिकाची एक प्रकारची झटापट चालूं असते. मात्र कधीं अशीहि समर्थ कविता भेटते कीं मधली झटापटीची क्रिया झपाट्यानं ओलांडून एक विरघळल्याची भावनाच अनुभवावी लागते; पण या दोन्हीं क्रियांत मन नकळत अशा कांही गोष्टी जमा करीत राहतं, कीं त्यांतून कवीच्या व्यक्तित्वाची आकृति मनांत रूप धारण करूं लागते. वेगवेगळ्या संवेदना, जाणिवा, भावनांची तृप्ति-अतृप्ति असे अनेकविध कवितांतील विविधरंगी, विविध स्वरूपी अनुभव आपापलं स्वतंत्र (व तसं परिपूर्णहि) अस्तित्व त्या एकसंध आकृतींत विलीन करीत राहतात. न साधलेल्या, फसलेल्या कविताहि या बाबतींत आपलं काम चोखपणानं बजावतात. [पुष्कळ वेळां अशा कवितांतील घटक विघटित अवस्थेंत (Analytical) असल्यानं, सुघटित अवस्थेंतील कवितेसाठी करावी लागणारी विश्लेषणाची प्रक्रिया न करावी लागल्यामुळं या कविता अधिक स्पष्टपणानं व जलदीनं या कामांत हातभार लावतांना आढळतात.] पण या क्रियेला बिलगूनच दुसरीहि एक क्रिया चालूं असते कीं, जी या आकृतींत रेखीवपणा आणते व रंगहि भरते. ज्या भावविश्वांतून कवि गेलेला असतो त्याचा विचार मनांत चालूच असतो विशिष्ट भावानुभव कवीच्या मनांत विशिष्ट प्रकारच्या

प्रतिक्रिया निर्माण होतात, याचे काव्याच्या संदर्भात अंदाज बांधले जाऊं लागतात. खरं म्हणजे रसिकाने चांगल्या कवितेंत, भावानुभावाच्या प्रतीतींत या प्रतिक्रियाहि एकदमच अनुभवलेल्या असतात; पण त्या वेगळ्या करून अंदाज बांधण्याचा खेळहि मनांत चालू असतो. कधीं अनपेक्षित अशी प्रतिक्रिया आढळली, ती अस्सल असल्याची मनाची खात्री पटली, तर जें मूळ प्रकृतींत सुप्तपणानं होतं तें जाणवलं नव्यानं, दिसलं नव्यानं, अशी त्याच्या मनाची समजूत पटते आणि पुनः नवे अंदाज बांधतांना तिचा उपयोग रसिकाचं मन करूं लागतं. आणि अखेर कवि–रसिकाच्या या अबोल संवादांतून ज्या अर्थाची निर्मिति होते तिचा आस्वाद म्हणजे काव्याचा आस्वाद होऊं लागतो.

अशाच पद्धतीनं पुष्कळसं काव्य वाचलेल्या वाचकाच्या मनांत कांहीशी नकळतच इतर कवींच्या काव्याशीं, व्यक्तित्वाशीं, वाचत असलेल्या काव्याची एक तुलनाहि चालूं राहते. या 'घुसळण घुसळण्या'च्या क्रियेंतून जें त्या कवीचें खास वेगळेपण असेल तें त्याच्या अनेकांशीं असलेल्या सामान्यत्वापासून वेगळं दिसूं लागतं. आणि तें त्या रसिकाच्या मनावर दीर्घकाळ ठसा उमटवून राहतं.

आणखी पुढें हा प्रवास चालूंच असतो. ते भावानुभव, त्या प्रतिक्रिया वाचकाला त्याच्या स्वतःच्या संवेदनविश्वाकडे, अनुभवाकडे, त्यावरील क्रिया–प्रतिक्रियांकडे ओढून नेत असतात. कवीच्या व रसिकाच्या अनुभूतींत साम्य वा भेद आढळला तरी फारसा वाद होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कारण सुख असतं तें जुन्या–नव्या अनुभूतींच्या प्रतीतींत, त्यांतून जीवनाचा शोध घेण्यांत. तो शोध चालूच राहतो.

मग कांही काळानं हा कांहीसा एका दिशेला चाललेला प्रवास संपून परतीच्या प्रवासाला प्रारंभ होतो. ज्या शब्दांनी त्या अनुभवांची ––व्यक्तित्वाची ओळख करून दिलेली असते त्यांचं अस्तित्व कांही काळ आपण विसरून गेलेलों असतो. त्याचं भान निर्माण होऊं लागतं––(एखाद्या मध्यस्थाच्या मदतीनं प्रियकर भेटावा; पण त्या मध्यस्थाच्या अस्तित्वाचाच कांही काळ विसर पडावा तसं कांहींसं !) कवितेंतील कांही शब्दांशीं, त्यांनी तयार केलेल्या शब्दबंधांशीं आपलीं वेगवेगळीं नातीं निर्माण होत असतात. कधीं

त्यांनी त्या कवितेंतील अनुभवाला दिलेल्या सहकार्यामुळे त्यांच्याशीं सलोखा निर्माण होतो, कधीं त्यांचा ताजेपणा, नव्या संदर्भांत झालेला उपयोग आकर्षित करतो; तर कधीं अतिपरिचयानं त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं जातं, अवज्ञा करावी असं वाटूं लागतं. अनुभवाशीं विसंगत आणि अत्यंत सामान्यरीतीनं शब्दांचा उपयोग झालेला असेल तर मग कांही काळ मनस्थिति द्विधा होऊन जाते. हें काव्य आपल्याला आवडलं कीं नावडलं हेंहि ठरवणं कठीण होऊन बसतं अशा सीमारेषेवरच पुष्कळसं काव्य राहून जातं. मग रसिकाचं मन कांहीसं अलिप्त, उदास राहतं.

पण कधीं कधीं या शब्दब्रह्मांतून निर्माण झालेलं भावगर्भ वातावरण पुरतंच वेढून टाकतं. स्वरहीन, शब्दहीन अवस्थेंतील मूक संवाद चालू राहतो असं म्हणावं, कीं इथं केवळ प्रतीतीचं विश्व असतं असं म्हणावं, हें नेमकं कळत नाही; पण अशीहि एक अवस्था आपण अनुभवीत असतों हें खरं आहे.

रसिकाच्या काव्यास्वादाच्या प्रवासाचं स्वरूप व त्यांतील कांही टप्पे असे असतात—सामान्यपणें असे असतात असं म्हणतां येईल.

सौ. संजीवनीबाईंच्या या संग्रहांत त्यांच्या लहानमोठ्या सहा संग्रहांतील कांही निवडक कविता घेतल्या असून अगदी अलीकडच्या काळांतील कांही अप्रसिद्ध कवितांचाहि त्यांत समावेश केलेला आहे. निवडलेल्या कवितांत प्रणयपर काव्येंच अधिक आहेत. कारण तो त्यांच्या काव्याचा प्रधान विषय आहे. संजीवनीबाईंनी इतर कांहीं विषयावरहि थोडीबहुत रचना केलेली आहे; पण अगदी पहिल्या वाचनांतहि ही 'त्यांची कविता' नाही हें समजतं. म्हणून अशा कविता वगळलेल्या आहेत. संजीवनीबाईंनी 'निजलेल्यांना जागविण्यासाठी 'माझ्या प्रतिभे। सान बालिके। होई विश्वरूपिणी। असं म्हटलं असलं तरी तिनं त्यांचं ऐकललं दिसत नाहीं. ती मुख्यतः प्रणयाच्या जगांतच रमली.

'संसार' या पहिल्या संग्रहापासून आजपर्यंतच्या काव्यनिर्मितींत संजीवनीबाईंच्या विकासाचा आलेख सरळच आपल्याला दिसतो. त्यांनी फार मोठा पल्ला गांठलेला आहे असा याचा अर्थ नाही. पण काव्यविषयक जाणिवा निर्माण होण्यापासून प्रगल्भतेपर्यंत पोहोचलेल्या या संग्रहांतून

आपल्याला दिसतात. पहिल्या संग्रहांत अजाणतेपणीं आलेला पहिल्या-वहिल्या आविष्कारांतील ताजेपणा आकर्षित करतो, तर 'चित्रा' या अलीकडच्या संग्रहांत संजीवनीबाईंना जाणवलेली अनुभवांची संनिश्चता व त्यानुसार बदलावीं लागणारीं आविष्काराचीं रूपें याची जाणीव अगदीं स्पष्टच दिसते. त्यांनीं काव्यलेखनाला प्रारंभ केला त्यावेळीं इतर अनेक कवींच्याप्रमाणेंच तो त्यांच्या हौसेचा विषय होता. आपल्या 'जीवनघन' या कवितेंत त्या लिहितात,

मी बाल्याच्या सीमेवरुनी
यौवनांत निरखून पाहिलें
अनुभूतीचें त्याच रम्यतर
प्रथम जगा मी गीत गायिलें

होतें माझें अंतर भरलें
विस्मयकारक सुजाणतेनें
होते माझे भाव लोभले
तिहीं जगांतिल मोहकतेनें

सुंदरतेशीं समरसलेलें
जीवन होतें गीत खरोखर
प्रतिशब्दांतून सहज उफाळुन
प्रगटत होतें सुरेल अंतर

अशा ह्या सहजतेनं संजीवनीबाईंच्या काव्याची सुरवात झाली. त्यांचं सौंदर्यवेधी मन, उपजत लाभलेला सुरेल आवाज आणि गीतगायनाची भावपूर्ण शैली यामुळें काव्यरचनेची त्यांची हौस रसिकांच्या नजरेंत लवकर भरली. 'संसार' मधील 'शांत सागरीं कशास उठविलीस वादळें ?' 'तेवतां तेवतां वात मंदावली' 'नांत नीज मी साठविते' किंवा 'आला स्वप्नांचा मधुमास,' या गीतांनी रसिकांना धुंद करून टाकलं. आजहि या गीतांची माधुरी कमी झालेली नाही. पण या यशामुळेंच अनेक वर्षं संजीवनीबाई गीतनिर्मितींतच गुंगून गेल्या आणि अभिजात काव्याकडे त्यांचं दुर्लक्ष झालं. (कदाचित् या दोन्हींतील वेगळेपणाची जाणीव त्यावेळीं त्यांना झाली नसेल.) त्यांची स्वरानुसारी शब्दरचना अनुभूतीच्या

स्वरूपाशीं, तिच्या घनतेशीं प्रामाणिक राहिली नाही. काव्यांतील प्रत्येक शब्दाचं वजन, त्याची लय, याकडे त्या स्थूल दृष्टीनं पाहूं लागल्या. किंबहुना अनुभूतीच्या स्वरूपाचा कलादृष्ट्या गंभीरपणें विचारहि न करतां केवळ कांही प्रसिद्ध गीतांच्या लोकमान्य झालेल्या चालींच्या अनुषंगाने ललित-मधुर शब्दांची पखरण कवयित्री करीत आहे, असंहि कांही कविता उघड-उघड दाखवूं लागल्या. त्यांच्या गीतांत अनुभवांचं कसदार घनस्वरूप दिसेनासं होऊन त्याला विरल (Diluted) स्वरूप येत गेलं. तीन मिनिटांत आटोप-णारीं भावगीतं गाणाऱ्या गायकाला अभिजात गायकी पेलेनाशी होते, प्रासंगिक विषयावर रेडिओसाठी श्रुतिका रचणाऱ्याला प्रौढ भारदस्त नाट्य-रचना करणं कठीण वाटूं लागतं; त्याप्रमाणं गानलुब्ध श्रोते डोळ्यांपुढे ठेवून काव्यनिर्मिति करूं इच्छिणाऱ्या पद्यकारांनाहि अभिजात काव्यनिर्मितीची साधना जड वाटूं लागत असावी. कधीं कधीं तीं साधणं अशक्यहि होत असावं. अशा पद्यकारांना मुख्यत: भान असतं तें सुरावटीचं व त्यांच्या काव्यप्रक्रियेंत कळत-नकळत सहजसाध्य रंजकतेशीं तडजोड होत असते. एखाद्या शिल्पांतील फत्तराचा गुळगुळीतपणाच त्याच्या जिवंत स्वरूपाला मारक ठरावा त्याप्रमाणं कांही अनुभवांच्या प्रकृतीला सुरावटीचं अस्तित्व विसंगतहि होत असावं. संजीवनीबाईंच्या ज्या कांही चांगल्या कविता मनांत घोळत राहतात त्यांमध्यें काव्यांतर्गत अनुभूतीची लयबद्धता गेयतेकडे झुकलेलीहि असते; पण तिथं ती वाङमयीन गुणाचं स्वरूप घेऊन आलेली असते. शब्दांतून सुरावट येते सुरावटीसाठी शब्द नसतात.

एवढं खरं कीं संजीवनीबाईंची काव्यनिर्मिति बराच काळ गीत-साधनेंत अडकून पडलेली दिसते. त्यांच्या गीतांतून भावानुकूल शब्दयोजना आहे, विशिष्ट प्रकारच्या वातावरणाचा आभास निर्माण करण्याची त्या शब्दांत शक्ति आहे, मध्यवर्ती कल्पनेचा बांधेसूद, आटोपशीर विस्तार (विकास नव्हे) आहे, अलंकारांचा, प्रतिमांचा माफक उपयोग आहे आणि या सर्वांच्या मुळाशी आवश्यक तेवढी गेयता आहे. यामुळे त्यांच्या प्रारंभींच्या गीतरचनेचें यश केवळ अभिनंदनीय आहे. आधुनिक मराठींतील नामवंत गीतकारांच्या मालिकेंत संजीवनीबाईंचा अंतर्भाव या गुणांसाठी जरूर करावयास हवा.

पण या यशानं त्यांचं समाधान झालं नसावं. किंवा अभिजात काव्याशीं त्यांच्या व्यक्तित्वाचं असलेलें नातंहि प्रबळ ठरलं असावं. त्यामुळंच आपलीं गीतं उत्तम काव्यं आहेत असं पटवून देण्याचा अट्टाहास न करतां त्या त्यांच्या शक्तीनुसार काव्यसाधना करीत राहिल्या. त्यामुळंच १९४३ पासून १९६१ पर्यन्त त्यांनी केलेली वाटचाल या संग्रहांत एका दृष्टिक्षेपांत जेव्हां दिसते तेव्हां 'संजीवनीबाईंचं काव्य म्हणजे केवळ गेयरचना' हें समीकरण बदललं पाहिजे असं वाटूं लागतं. पहिल्या 'संसार' या संग्रहांतील 'विभ्रम', 'वेडा जीव', 'भ्रांति', यांसारखीं काव्यें हीं विकासाचीं बीजें प्रथम-पासूनच होतीं हें स्पष्ट करतात. या कवितांतील पदरचना (चरण) स्पष्टीकरणात्मक वा वर्णनात्मक नाही, त्यांना प्राप्त झालेल्या सहज व्यंजकते-मुळें वर्णनात्मक रचनेला नसलेलीं परिमाणं या काव्यांना लाभलेलीं आहेत. त्याचप्रमाणं कवितेंतील मध्यवर्ति भाववृत्ति वा भावानुभव कोणत्याहि बाह्य कारणांनी शबल वा दुर्बल (Weak) झालेला आपल्याला दिसत नाहीं. 'छाया' या संजीवनीबाईंच्या दुसऱ्या संग्रहांतील 'एक सानशी कळशी', 'प्रतीक्षा', 'कितिदां तरी मी', 'आज घरास यायची' या कविता या दृष्टीनें आजहि ताज्या रसरशीत वाटतात आणि मोहवून टाकतात.

'भावपुष्प हा संजीवनीबाईंचा तिसरा काव्यसंग्रह 'गीतसंग्रह', आहे. त्यांनी स्वतःच 'गाण्याला कांही शब्द असावेत म्हणून हीं गीतें लिहिलीं आहेत,' असं प्रस्तावनेदाखल लिहिलेल्या 'भावबोला' मध्यें म्हटलेलं आहे. काव्यविकासाच्या दृष्टीनें 'भावपुष्प' व नंतर प्रसिद्ध झालेला 'परिमला' या दोन्ही संग्रहांतून आपल्या हातीं फारसं कांहीच गवसत नाही. पण त्यांत त्यांचीं प्रसिद्ध व लोकप्रिय झालेलीं बहुतेक गीतें असल्याने गीतकार संजीवनीबाईंच्या गीतांतील सुबोधता, स्वरलालित्य त्यांतील विविधता जाणवल्याखेरीज राहत नाही. त्याचप्रमाणं त्यांचीं गीतं म्हणजे 'अर्थहीन स्वररचना' असं स्वरूप प्रारंभापासूनच नसल्यामुळे त्यांत विरल स्वरूपांत आलेला काव्यात्मक-तेचा भागहि त्या गीतांच्या आकर्षकतेंत भर घालीत असतो. 'न कळतां निघून जा,' 'भाववेगें येउं पाहें मी तुझ्या रे मंदिरीं,' 'मी दिवाणी मी दिवाणी', 'फिरून एकदां नभीं असावा पूर्णचंद्र प्रीतिचा' या रचनेंतील गेयतेइतकाच भावहि काव्याच्या सामान्य रसिकाला आकर्षित करीत गेला आहे.

कालदृष्टया, ‘ चित्रा ’, अलिकडील अप्रसिद्ध कविता आणि बालगीतांचे छोटेसे दोन संग्रह यांचा एकत्रितच विचार करावयास हवा. ‘चित्रा’ संग्रहाच्या प्रारंभीं ‘गीत नव्याने ’ या कवितेंत नव्या काव्यरचनेसाठी भावनेचा नवा उमाळा, कल्पनेला नवा उजाळा हवा असून त्यामुळेंच शब्दांना नवचैतन्य प्राप्त होईल, अशी ‘नवी’ जाणीव संजीवनीबाई व्यक्त करतात. १९५७ पर्यंत मराठी कवितेंत घडून आलेल्या क्रान्तिकारक बदलांचा हा स्तुत्य परिणाम असावा, किंवा स्फूर्तीचा पहिला बहर ओसरल्यामुळेंहि ‘ नव्या ’ची मागणी करण्याची गरज कवयित्रीला वाटली असावी; पण या जाणिवेचा चांगला परिणाम असा झाला कीं, आजपर्यंत अभावाने जाणवलेले अनेक काव्यगुण या संग्रहांतून दिसूं लागले. एखाद्या अनुभवांत दडलेला सूक्ष्म नाट्यकण नेमका टिपण्याची दृष्टि आल्यामुळे काव्याला नेमका आकार येऊन आवश्यक तेवढंच सांगितलं जाऊं लागलं. ‘ भिंतीवरती ’, ‘ उत्तर ’, ‘ खूण ’, ‘ तीच काय मी ’ , ‘ आज मी ’, ‘ या वळणावर ’, ‘ बरं कां ग आई ’, ‘ तुज स्मरते ना ?’ अशीं कांही उदाहरणें सहज सांगतां येतील. अनुभवांचं एकेरी——एकपदरी, कांहीसं सरधोपट स्वरूप जाऊन त्यांतील संमिश्रता कवयित्रीला दिसूं लागली, तिच्या मनांत रूप घेऊं लागली (माझें-तुझें, तूं नि मी. प्रीतिखातर, उपेक्षाच नेसण्या, नाही आतां, आज मी, दैन्य). एखादी भाववृत्ति व्यक्त करितांना तिच्या नाजूकपणाला धक्का न लागतां ती अ-विरल अवस्थेंत व्यक्त होऊं लागली (आभाळ, आज मी). कांही अनुभवांना पारदर्शक प्रतिमांचा कलापूर्ण घुंघट मिळूं लागला, (मौन, जीवन, पारिजात, क्षितिजावरतीं इथें) आणि त्यामुळेंच या कवितांत अर्थाचीं वलयं निर्माण करण्याचं सामर्थ्य आलं. सामान्य अनुभवांना वैशिष्टयपूर्ण जीवनदृष्टीची जोड मिळाल्यानं त्यांना स्वतंत्र स्थान आहे, अस्तित्व आहे हें जाणवूं लागलं. अर्थातच त्यामुळं काव्यांतील विशिष्ट कृत्रीम भूमिका (Pose) कमी झाली. (आज, ओढ, सावळी, नको ताटातुटी, जीवन, या वळणावर, दैन्य, दिसे ना दिसे) कौटुंबिक जीवनांतील साधेसुधे अनुभव तशाच साध्यासुध्या पद्धतीनें व्यक्त होऊं लागले. त्यांतील सजावटीचा भाग गेला (माहेर, सुट्टी, मणी). पूर्वीच्या संग्रहांतून आढळणारं स्वप्नरंजन वेगळ्या स्वरूपांत दिसूं लागलं. वास्तवाच्या जाणिवेंतून तें येत गेल्यानं जीवनानुभवाचा एक भाग असं स्वरूप त्याला आलं. त्यांतील

अ-वास्तवता गेली (नाहीं आतां, स्वप्न, ओझें), आणि या सर्वांच्या जोडीला शब्दांचा अधिक संयमित व कलापूर्ण उपयोग संजीवनीबाई करूं लागल्या. (मौन, उगीच, भासच, नाही आतां ).

या साऱ्या काव्यगुणांमुळे संजीवनीबाईंच्याबद्दल साधार अपेक्षा निर्माण होतात. 'मी चुकलें अन् चुकणारच वरचेवर' यांत आतां स्वप्नरंजन नाही. 'मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरतें कशी' असं म्हणत म्हणतच, ठुमकत ठुमकत येणाऱ्या शब्दांच्या गौळणीचें त्या वर्णन करूं लागतात तेव्हां काव्यान्तर्गत नाट्यनिर्मितीची कला त्यांना अवगत होऊं लागलेली दिसूं लागते. 'मी नसतें तर झालें नसतें संसाराचें असें रणांगण' असं खेळकरपणानं त्या लिहितात तेव्हा काव्याच्या मुळाशीं असलेलं व्यक्तित्वाचं वेगळेपण केवढी किमया करूं शकते हें समजूं लागतं. त्यांच्या या व्यक्तित्वाला आतां 'बोलावंसं वाटे, पण ओठ उघडेना; मुकं रहावेंसें वाटे पण वाचा आटोपेना !' अशा विचित्र 'अनुभवांतून उभ्या यात्रेंत देव भेटत नाही ही जाणीव होऊं लागली आहे. यामुळेंच संजीवनीबाईंच्या काव्यविकासाचा आलेख अजून चढता आहे असं म्हणतां येईल.

हें खरं आहे कीं कांही कवितांत वर उल्लेखिलेल्या गुणांचा अभावहि जाणवतो. अजूनहि त्या पुष्कळवेळां आविष्कारांतील सहज सोप्या सांकेतिकतेला वश होतात, कधीं स्पष्टीकरणात्मक लिहूं लागतात, कधीं तात्पर्य सांगतात, तर कधीं तांब्यांचे, कधीं बोरकरांचे, कधीं आपटकरंदीकरांचे व क्वचित् इंदिराबाई संतांच्या काव्याचे सूर, लकबी यांचं अनुकरण करीत राहतात; पण या अशा दोषांवर मात करणारे गुण दिसतात हें निर्विवाद आहे.

या गुणांच्या जोडीला त्यांच्या काव्यविषयांत आलेलं भावानुभवांचं वेगळेपणहि मराठी कवितेच्या दृष्टीनें मला महत्त्वाचं वाटतं. त्यांच्या प्रेम-शोधनांत त्यांना केवळ 'स्वप्नांचा मधुमास'च अनुभवावयास मिळालेला नाही. अनेक प्रसंगीं तिचा दाहहि सहन करावा लागलेला आहे. अगदी प्रारंभींच 'प्रीती हे मायाविनी' असं म्हटलं असलं तरी तें जाणवलं मात्र बऱ्याच उशिरा असं दिसतं आहे. शांत सागरांत उठविलेल्या वादळाची 'झुळुक'च प्रारंभीं जाणवलेली होती ! पण पुढे अनेक प्रसंगीं त्या वादळांत प्रीतिभावनेलाच भोंवळ येण्याचे प्रसंग येत गेले आहेत. जळणारें जीवन

स्मरणालाहि जाळत सुटल्याचं अनुभवावं लागलं आहे. प्रियकरानं दाखविलेल्या अनोळखीपणांतून 'प्रीतिसतीला उपेक्षाच नेसण्यां?' अशा संभ्रमांत तळमळावं लागलं आहे. रसघन दूर वळल्याने जीवनाची फुलबाग सुकून वठून गेली, असं कांही काळ घडलेलें आहे. सर्वस्वाचं दान देऊन आणि घेऊनहि धग-धगत्या स्मृतिज्योति अश्रूंच्या डोहांत विझवण्याची वेळ आली.

नाहीं आतां ठेवणार
मोहपाशीं गुंतवून
नाहीं कांही मागणार
मीच अपुली देईन
नाहीं ओठीं आणणार
शल्य मनीं सलणारें
नाहीं नेत्रीं दाविणार
भाव मनीं झरणारे

असा कांहीसा अ-मानवी रूप देण्याचा कारुण्यपूर्ण प्रयत्नहि त्यांना करावा लागला आहे. आपलं सारं जीवन क्षितिजावर भ्रांतपणें उभ्या असलेल्या संध्येसारखं, उषेसारखं आहे. असा अखेर या प्रेमशोधनांतून संजीवनीबाईंना गवसलेला अर्थ आहे, आणि या साऱ्या जाणिवांतूनच त्या जेव्हां

माझें-तुझें सारें कांही
असे विषम–वेल्हाळ;
माझी चंचल मासोळी.
तुझें अनिवार जळ

असें लिहितात तेव्हां त्या अनुभवाचं सुख आणि आविष्काराचं सौंदर्य अधिक प्रतीत होऊं लागतं.

याशिवाय संजीवनीबाईंच्या काव्यांत आणखी एक भावानुभव आतां नव्यानं येऊं लागलेला दिसतो आणि त्याचा ठाव जर त्यांना घेतां आला तर पूर्वी उल्लेखिलेल्या काव्यगुणांच्या साह्यानं त्या आणखी मोठी झेप घेऊं शकतील. ढासळत्या यौवनाचं, 'अर्ध्याच रस्त्यावर थांबलेल्या अभिनवतेच्या कलाकुशल रथाचं' चित्र त्या आतां रंगवूं लागल्या आहेत.

'माथ्यावरलीं कुरळें आतां नाहि राहिलीं काळी,
गालीं, भाळीं इथें तिथें सुकुत्यांचीं जाळीं,
आतां माझी आहे – नाहीं गालांवरली खळी;
ओसरून गेली आता अधरांवरली लाली.'

जीवनाच्या या अवस्थेंत भूत-वर्तमान-भविष्याचीं जीं तुरळक चित्रें त्या रेखाटतात तीं आजहि खिळवून ठेवतात. अमुक एका विषयावर कवीने लिहावें असें आपण कोण सांगणार ? पण या अनुभवाचं वेगळेपण त्यांच्या नव्या कवितांतून जाणवतं एवढं खरं. आणि जिथं जाणवतं तिथं संजीवनीबाईंच्या व्यक्तित्वाचें वेगळेपणहि मनाला आकर्षित करतें.

आजकाल संजीवनीबाईंच्या शिशुगीतांचा एक चांगला छोटा व मोठा रसिकवर्ग तयार झाला आहे. मोठ्या माणसाचं अनुकरण करणारीं लहान मुलं, लहान मुलांच्या दृष्टीला दिसणारं मोठ्यांचं जग, अशा काव्यांतून त्या सहजतेनं व्यक्त करतात. त्यामुळं 'बरं का ग आई' सारखी कविता मोठ्यांनाहि खूष करतें. बालसुलभ कल्पकतेचं दर्शन त्याच्या 'ढग आले' सारख्या काव्यांतून त्या सहजतेनं घडवितात. कांहीं गीतं केवळ नादनिदर्शक शब्दांचीं तर कांहींमध्ये एखाद्या, छोट्याशा खेळाचं वर्णन केलेलं, तर कांहींमध्यें मुलांच्यावर चांगले संस्कार व्हावेत यासाठी कथाभाग आणलेला दिसतो. कांहींमध्यें केवळ सौंदर्यदृष्टि जागी करण्याचा हेतु असतो आपल्याकडें 'खऱ्या' शिशुगीतांचं असलेलं दुर्भिक्ष्य ध्यानांत घेतां नव्यानं सुरू झालेल्या बालवाङमयाच्या शाखेंत संजीवनीबाईंची विविध प्रकारची रचना महत्त्वाचें स्थान मिळवून राहील. अशा बालवाङमयाची आवश्यकता तीव्रतेनं नेहमीच जाणवत आलेली आहे. त्यामुळं गरज आणि पुरवठा या तत्त्वांवर अशा वाङमयाची निर्मितीहि आजकाल अनेक लेखक-लेखिका करतांना दिसतात. हें 'बाल'वाङमय धड बालांसाठीं नसते आणि प्रौढ वाचकांसाठीं तर नसतेच नसते. या लहान मुलांना वाङमयीन भाषेंत तक्रार करतां आली असती तर ती त्यांनी नक्की केली असती ! खरं कलात्मक स्वरूप घेऊन आलेलं बालवाङमय मोठ्यांचंहि चित्त आकर्षित करून घेतं--मोठ्यांचीं कारणं कांही वेगळीं असतील--पण असं झालं तरच ही वाङमयशाखा

कांहीं शाश्वत स्वरूपाची भर वाङ्मयाच्या प्रांतांत घालील. संजीवनीबाईंनी 'बरं कां ग आई' सारख्या काव्यांतून हें साधलं आहे, म्हणून त्यांच्याकडून अधिक अपेक्षाहि आहेत.

राजकवि तांब्यांच्या काव्याचा अखेरचा कालखंड, 'रविकिरणा'च्या भरभराटीचें युग, अनिल कुसुमाग्रजांची साधारण त्याच काळांतील पण भिन्न स्वरूपाची निर्मिति आणि मर्ढेकरांपासून बदललेलें मराठी काव्यांचें रूप संजीवनीबाईंनी अगदी जवळून न्याहाळलें आहे. या निकट परिचयानं संजीवनीबाईंच्या काव्याचा वाण आणि गुणहि बदलत गेले आहेत. त्या त्या कालखंडांतील कलाविषयक जाणिवांचें मूळ व्यक्तित्त्वावर कलम होत गेलें आहे. आतां त्यांच्या प्रणयवेधी सौंदर्यशोधक व्यक्तित्वानें असें रूप घ्यावें कीं ज्याचा ठसा मराठी काव्यावर दीर्घकाळ टिकेल.

१९ ऑक्टोबर १९६१
विजयादशमी, १८८३

—सरोजिनी कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
३९८३३ दि: 8/10/64
२५४६ नों. दि: 8/9/26

सौ. संजीवनी मराठे

यांचें

प्रकाशित काव्य वाङ्मय

१. राका — कविता
२. संसार — कविता
३. भावपुष्प — गीतें
४. छाया — कविता
५. गंमत — बालगीतें
६. चित्रा — कविता
७. परिमला — गीतें
८. बरं का ग आई — बालगीतें

# दयाघना

पद टाकिन मी, परि दयाघना
तूं उभा पाठिशी असशिल ना ?
प्रखर वाहुनी पिसाट वारे
नाशितील वन-वैभव सारें
परि पर्णांतरिं एखाद्या रे
सुम-रूपें मज दिसशिल ना ?
रात्र वादळी असो भयंकर
खुशाल तारूं कापिल अंतर
कधिं तरि बिजली-रूपें अंबर–
भेदुनि चमकुनि जाशिल ना ?
सरतां प्रीतीची मधुमाया
येइल विपदा घालित छाया
वच धीराचा समयिं अशा या
प्रेममया तूं वदशिल ना ?
वाट यशाची शोधुनि शोधुनि
हताश कधिं मी येतां परतुनि
अवतरुनी पूजिल्या शिलेंतुनि
संजीवन मज देशिल ना ?
तूं उभा पाठिशी असशिल ना ?

• • •

# वादळ

शांत सागरीं कशास उठविलींस वादळें ?
हृदय-कोट भेदिला कशास, कोणत्या बळें
काय हें तुझ्यामुळें
देहभान हरपलें ?
युगसमान भासतात आज नाचरीं पळें !
अमृत मधुर बोल एक
श्रवणिं जों न पाडिलास
अधिरता भरे जिवांत केवढी तयामुळें
निमिषमात्र लोचनांत
दिव्य तेज दाविलेंस
भडकुनी तयेंच वन्हि जीव आंतला जळे.
पढविल्या वदे वचांस
बद्ध त्या विहंगमास
गायिलेंस तूं कशास गीत नंदनांतलें ?
स्वर्ग कल्पनेंतला
येइल कधि भूतला
दिवसरात्र अंतरांत आस ही उचंबळे !
शांत सागरीं कशास उठविलींस वादळें ?

● ● ●

# नव-संमोहन

जरि त्रिभुवन भवतीं झांकळलें
सखि प्रतिपलिं हें अंतर उजळे.
श्रवणीं न येई कटु आक्रंदन
नयनां न दिसे करुण-प्रसाधन
सुंदर सोज्वल स्नेहल यौवन
नकळत हृदयीं मुसमुसलें.
प्रकाश अवघा, नुरली छाया
जिवाजिवातुनि भरली माया
ओसंडुनि न्हाणित मम काया
सुखतरंग उरिं सळसळले.
जीवन ? छे सखि हें नंदनवन
प्रणय तयांतिल चिर-संजीवन
अमृतमय हें नव-संमोहन
कळिकाळा व्यापुनि उरलें !

● ● ●

# मंत्र-मुग्ध

करपाशीं बांधुनिया
मन्मुखास चुंबिलेंस
रक्त धुंद लोचनांत
दाविलीस अमर आस

चुंबुनिया अधर नेत्र
ठेविलेंस मज निश्चल
हसविलेंस रुसविलेंस
रोमरोम करुनि विकल

स्थितिहि नुरे गतिहि नुरे
विकलताच मात्र उरे
शपथ दिव्य मंत्राची
घातलीस काय करें ?

ये घेउनि जादु तुझी
जिंकाया नागिण ही
भानाचें जिंकि जहर
प्रीतिसुधा भरिं देहीं

प्रीति ? हो प्रीति अतां
तनमनास जागवील
तुज माझ्या मज तुझिया
अंतरांत वागवील !

● ● ●

# तेवतां तेवतां

तेवतां तेवतां वात मंदावली
अजुनि ना मंदिरीं पाउलें वाजलीं

पूजना जीं सुमें आणिलीं वेचुनी
तीं वियोगें तुझ्या म्लानता पावलीं

गावया गीतकें भक्तिचीं प्रीतिचीं
उतरते सारखी तार जी लाविली

पायवाटा किती रेखिल्या दिनभरी
लोपवाया तयां रात्र अंधारली

बधिर या जाहल्या अंतरींच्या कळा
वाणिची बासरी भंगली शांतली

जन्म-जन्मांतरीं राहिली जी दुरी
घाल आता तरी दिव्य ती साउली

तेवतां तेवतां वात मंदावली !

● ० ●

# विभ्रम

दर्शनें तूझिया भान ना राहिलें
नाकळे केवि मी तूजला पूजिलें.

काय स्तोत्रें तुला  दिव्य मी गायिलीं
त्या क्षणीं वाणि ही  मूक वा राहिली

क्षाळियेलें पदां  काय नेत्रोदकें,
हर्षुनी अश्रु वा  जाहले पारखे ?

भावगंधें तुला  काय मी चर्चिलें,
सुगुण-चंदन तुझें  मीच वा वेष्टिले ?

काय प्राणानलें तुजसि ओंवाळिलें
कांतिनें वा तुझ्या  मीच पुंजाळलें ?

काय जीवित्व मी त्वत्पदीं अर्पिलें,
वा प्रसादें तुझ्या  मीच संतोषलें ?

पोळतें अंतरी  विभ्रमें नित्य मी
शांतवी धावुनी  जीव माझा श्रमी !

● ● ●

# अजुनि नको जागूं !

हृदया, अजुनि नको जागूं
मृत जगतीं या सजीवतेचा छंद नको मागूं.

थडग्यांचें जग तुझिया भवतीं
तयामधिल ही स्मशानशांती
तुझ्या मनींची सूरसंगती पाहिल रे भंगूं

काळोखाच्या अवकाशीं या
भुताटकीची भरली माया
स्पर्शे तिचिया करपे काया, नादिं नको लागूं

बघ उघडा रात्रीचा जबडा
परजत अपुल्या अनंत दाढा
अशा राक्षसी–पुढें नको रे पिशापरी वागूं.

या नरकांतुनि प्रभात येइल
तेजोगीतें मृतांस गाइल
नीज तोंवरी विझल्या शरिरीं
किति समजुनि सांगूं
हृदया अजुनि नको जागूं !

• • •

## पौर्णिमा

सख्या येई अंगणांत – आज पौर्णिमेची रात
भावसिंधूवरी नाचे – माझी लाजलेली प्रीत
पानोपानीं उमलल्या – गोड सुगंधाच्या कळ्या
मनोमनीं तरंगल्या – आशा–पूर्तीच्या साउल्या
कोनाकोनीं उजळल्या – चंद्रकिरणांच्या ज्योती
अंतरंगीं निनादल्या – मुग्ध प्रणयाच्या गीती
मेघांवरी ओसंडते – दिव्य रजताची गंगा
रोमांचाची पखरण – मोहरवी अंग अंगा
आज नको जीवनांत – कांहीं असायातें उणें
सख्या येई अंगणांत – गाऊ पौर्णिमेचें गाणें.

• • •

## स्वप्न-स्मृती

नयनांत नीज मी साठवितें
तें स्वप्न गोड मनिं आठवितें !
अशीच होती रात्र चांदणी
रंगत होत्या तारा नर्तनिं
गुंग चराचर गीत-गायनीं
ती अद्भुत जादू मनिं भरते ! १

दिव्य मूर्तिची सुखद साउली
हळूच माझ्या मंदिरिं आली
स्मितें सुगंधी भवतीं फुलली
स्वप्नांत स्वप्न जणुं मी बघतें ! २

स्कंधावरुनी ओढणी गळे
केशपाश शिरिं मुक्त सळसळे
धुंद गोड मग्न नयनीं तरळे
मज जिंकियलें मदनें पुरतें ! ३

हृदयेशें मज जवळि घेतलें
गुपित गोडसें कानीं कथिलें
लाजत मी कांहीं पुटपुटलें
त्या रम्य स्मृती मनिं पालवितें. ४

अशीच राहो रात्र चांदणी
नशा चढो माझिया लोचनीं
जीवन पाहूं दे मज स्वप्नीं
ज्यावाचुनि जग हें आज रितें ५
तें स्वप्न गोड मनिं आठवितें.

● ● ●

## संधिकाल

संधिकाल पातला जवळि घे सख्या मला।
जें कधीं न गायिलें
गीत मन्मनांतलें
सूर सूर आळवून ऐकवीन रे तुला !
दडविलीं स्मितें जरी
अधर-संपुटांतरीं
आज स्वैर तीं विहार करितिल रे प्रेमला !
दाविलें न लोचनीं
तें वदेन भाषणीं
बनुनि धुंद प्रेमरंग उधळिन रे आपुला
संधिकाल पातला जवळि घे सख्या मला.

● ● ●

## वसंत

आज माझ्या अंगणांत वसंताचा खेळ
पानोपान बहरली माझी मनोवेल
ओशाळून परतली निराशेची रात
उसळत्या आनंदाची उजळली प्रात
बहरल्या आशा गाती कुहू कुहू गोड
चराचरीं नादब्रह्मा सापडेना जोड
थय थय थय नाचे माझा भाव मोर
भरारते कल्पना ही वाऱ्याहूनी स्वैर
भूतभविष्याचा राया नको घालूं मेळ
आज माझ्या अंगणांत वसंताचा खेळ

● ● ●

# प्रतीक्षा

वाटत असतें अकस्मात तूं देशिल मज दर्शन
म्हणुनि अहर्निश सज्ज राखितें मी माझें अंगण

सप्त सुरांतुनि येशिल वाटे घुमवित तव बासरी
प्रतिपलिं घेते चाहुल श्रवण्या ती अनुपम माधुरी

प्रभात-वायूसवें वाटतें सुगंध तव येइल
साठविण्या तो भावसंपुटें राखित मी सोज्वल

कधीं वाटतें याचकरूपें येशिल माझ्या घरीं
म्हणुनि प्रीतिचा गोड घास मी घेउनि बसतें करीं

कधीं वाटतें स्वप्न-संगमीं देशिल संजीवन
संसारावरि कधि न खिळविते म्हणुनी मम लोचन

युगानुयुग मी बसेन पाहत वाट तुझी मोहना
कवण्या रूपें दर्शन परि तूं देशिल मज सांग ना ?

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32833 दि. ...
ग्रंथांक 9456 नों. दि. ...

# पाखरा

येउं नको मजसंगें, पाखरा !
मुक्या मुखानें जाइन पथिं मी
खूण न ठेविन मागें !
गुलाम झालें जीवन सारें
खुल्या दिलाचीं मिटलीं दारें
जुलुमाचे हे पाश पसारे,
जा परतोनी वेगें—
येउं नको मजसंगें !
हरित तृणांच्या तुला मखमली
शेज परांची निळ्या महालीं
चंदेरी ही रात्र रसेली
न्हाणिल तुज अनुरागें
येउं नको मजसंगें !
स्वत्वाचा तव उज्वल बाणा
प्रीतीचा तव छंद दिवाणा
ऊठ, अंबरीं आळवि ताना
तोड जडाचे धागे, पाखरा.
येउं नको मजसंगें

● ● ●

# मधुमास

आला स्वप्नांचा मधुमास
उमलवीत उरिंचा उल्हास
निद्रेच्या भूमीवर फुलल्या
स्वप्नसुमांच्या कळ्या कोवळ्या
मूक मनीषा अंतरांतल्या
उधळती स्वैर सुवास

ही नटवी प्रीतीची कलिका
घडिघडि दावी अनंतरूपां
धुंद करी अर्पुनि मनमधुपा
अद्‌भुत प्रणयविलास

टवटवलीं मृदु शैशवसुमनें
लेवुनि तें मधुमंगल लेणें
अनिर्बंध मन गुंगत गाणें
भोगी छंद-सुखास

जागृतींत जें जें वांछियलें
तें तें या स्वर्भूमधिं रुजलें
रसरंगें अंतर्जग नटलें
नाचत जीवन-रास

नवजीवन देती हृदयाला
या जगिच्या नितनूतन लीला
शिकवित हासुनिया करण्याला
सत्याचा परिहास !

आला स्वप्नांचा मधुमास

• • •

# वेडा जीव

कशास न कळे हा जिव आतुर
कसली त्यातें लागे हुरहुर ?

कधीं भंगल्या मूर्तीसाठीं
कधीं उडाल्या स्वप्नांपाठीं
कधि कधि स्मृति-सरितांच्या कांठीं
अश्रु-फुलांची विणितो झालर

विरलतेंत हा चित्र रेखितो
मौनांतुनि संगीत उकलतो
कधीं रित्या घटिकांवर रचितो
मनोराज्य अति भीषण सुंदर

स्नेह-विकल एकाकी जिव हा
रात्रंदिन भिरभिरतो वाया
न पुरे या गगनाची छाया
वसुधेचें या थिटेंच मंदिर

अशा पिशा जीवाची चिंता
किती बाळगूं उठतां बसतां
कशी वागवूं धरुनी हातां
जीव-बाळ हा तरळ अनावर !

● ● ●

## प्राण-पाखरूं

सुखावलें हें प्राण-पाखरूं
करीं तयाला नका हो धरूं.
पदीं तयाच्या प्रमोद-पैंजण
मधुमंजुल रवि करिती किणकिण
लहरतात इवल्या पंखावर
नवरंगांचे तरंग सुंदर
हसी खुशीचें असें पाखरूं
कुणी नकाहो तया आवरूं !

द्या दाणा नाचेल थयाथय
पुढे करा कर, बसेल निर्भय
परि क्षणमात्रें उंच अंबरीं
भरारेल ही लहरी स्वारी
चैतन्याचें चंचल तारूं
कुणी नका हो तया हकारूं !

भरभरुनी घ्या हलक्या हातें
निजकंठीं याचीं मधुगीतें
हावभाव मनमोहक याचे
निजनेत्रीं घ्या ठसवुनि साचे
परि तेजाचें प्रखर लेकरूं
नका बरें का कुणी आवरूं
नका सावरूं नका आवरूं

हें रस-लोलुप प्राण-पाखरूं !!

• • •

# प्रीती हे मायाविनी

देवते सखे वैरिणी
तुज काय वदूं गायनीं ?

कधि भासतेस डाकिनी
कधि शोभसि वरदायिनी
कधि लाजविसी मृदु फुला
कठिणता शिलेची तुला
कधि तम-हृदयीं विहरसी
कधि प्रकाश-मनिं हांससी
तुज शैलशिखर आवड
कधि तुडविसि डोंगरकडे
ना स्थिती न गति यापरी
तूं नांदतेस भूवरी

अर्पितां तुला पूजन
तूं जासी अव्हेरुन
दाबितां परी पदतलीं
चवताळुनि उठसी वरी

गूढता तशी सरलता
मत्तता तशी नम्रता
भेसुरता तशि चारुता
क्रूरता तशी मृदुलता

तव रूपीं संचारती
अंतरा ओढ लाविती
स्वप्नांत जीवनांत वा
तव ध्यास लागला जिवा
प्रीती ! हे मायाविनी
घे माया तव ओढुनी
या साध्या भोळच्या जना
ही साहवे न वंचना
तव पदीं एक मागणी।
जा दूर जाणिवेंतुनी !

● ● ●



म.सा.द. म८-२

# सुखाची अतृप्ति

कधींपासोनि जीवाला सुखाचा लागला ध्यास
स्वरूपीं विविध सृष्टीच्या तयाचा जाहला भास
क्षणाच्या सौख्यसंयोगें ठरेना जीवनीं शांती
विसावा लाभला मातें तुझ्या आलिंगनीं अंतीं
गुंफिले नेकळतां धागे गुंतला जीव हा वेगें
दचकुनी अढळ अनुरागें परी तो घडिघडी जागे.
शृंखला घेउनी हातीं मदन मज जिंकुनी गेला
बद्ध मी अंतरीं तुझ्या लावितें दोष दैवाला !
जिवांच्या जोडिदारा घे ओढुनी आपुली माया
जिवाला भूतलीं दावी तियेची गर्दशी छाया
नको रे प्रीतिनें बांधूं जिवाची माझिया पूजा
कुठेंही दूर एकांतीं जगापासोनि जा माझ्या.
करीं गुंफावया कोणी जिवलगा, घे दुजी राणी
नको रे लोचनीं माझ्या खेळवूं तृप्तिचें पाणी
नको तृप्ती जिच्या पोटीं स्मृतीनें मार्ग रेखावा
जिणें अतृप्तिचें वाटे सुखाचें माझिया जीवा !

• • •

## भ्रांति

माया-मृगाच्या रूपानें
प्रीत तुला बोलावील
तिला विद्ध करायातें
व्यर्थ जिवा झटशील !

ध्रुवताऱ्याच्या कांतीनें
प्रीत तुला खुणावील
तिचा माग घ्यावयासी
व्यर्थ जिवा शिणशील

सागराच्या उर्मीवरी
प्रीत तुला डोलवील
निद्रेचिया लालसेनें
व्यर्थ जिवा गुंगशील !

नित्य तुझ्या पदतलीं
प्रीत छाया पसरील
निवाऱ्याच्या आशेवरी
व्यर्थ जिवा घुमशील !

पेटती ही प्रीत अंतीं
सुखें उरा लाविशील
अनुतापें व्यर्थ जिवा
जळशील ! जळशील ! !

• • •

# संसार

करूं ये सुखमय हा संसार !
निष्कामाच्या वेदीवरती
करूं अधिष्ठित प्रीतीमूर्ती
सुकृतिच्या सुंदर सुमनांचे वाहूं तिजवर हार
मनिंचे चिंताघन उडवाया
तसेंच उसनें वितुष्ट जाया
गुणी जनांना खुलें करूं या निजस्नेहाचें दार
दांभिकतेची न ठरो दृष्टी
कुटिलांची दुरि राहो सृष्टी
यास्तव निजवृत्तींना लावूं निस्पृहतेची धार
दया क्षमा शांतीचें आगर
प्रकाशमंदिर करुं अपुलें घर
अनन्यभावें परमेशाचा पूजूं जगदाकार
धर्म अर्थ कामाचें सुव्रत
काया वाचा मनें आचरित
नवराष्ट्राचे पालवुं अंकुर तेजवंत झुंजार
करूं ये सुखमय हा संसार

● ● ●

# दिनान्तीं

ये बैस जराशी मजजवळी
दूर राहुंदे काम हातचें सरायचें तें कधि न मुळीं
चरितार्थाच्या लागुनि मागें
वणवण फिरलों दिसल्या मागें
मनिची शांती त्यांत हरपली, श्रमभारें गात्रें थकलीं
तूंही असशिल दिनभर श्रमली
आवरितां हीं बाळें इवलीं
प्रसन्नतेची गाढ साउली जरि न मखोंची तव ढळली
घडिभरि आता बिलगुनि राहूं
ताप जिवाचा विसरुनि जाऊं
हासूं बोलूं मौनहि सेवूं हुंगूं भावफुलें सगळीं
सखि, या सुखशांतीचे वेळीं
निद्रेचा कर फिरतां भाळीं
तरंगतिल वरि दुःखें सगळीं, सौख्य मात्र राहील तळीं
ये बैस जराशी मजजवळी !

• • •

# माझे आई !

सुखाचिया सागरांत
हेलावतां जीवभाव
तुझ्या स्मृतीतें ना ठाव
माझे आई !

शृंगाराच्या साउलींत
फुलवीतां भावकळ्या
तुझ्या स्मृती विरसल्या
माझे आई !

यौवनांच्या अहंतेनें
संकटांशीं झुंजतांना
दूर तुझ्या स्मृति–खुणा
माझे आई !

मात्र तान्ह्या लेकराला
चुंबितांना कवळोनी
तुझी स्मृती माझ्या मनीं,
माझे आई !

● ● ●

# सोनसळी

हासेना बोलेना का गऽ मुळी
माझ्या जिवाची ही सोनसळी
चिंता मनीं माझ्या भारावली
कां ग ऽ फुलेना ही चाफेकळी ?

चंद्रा ! हिच्या नेत्रिं कांती तुझी
वदनीं हिच्या वाणि भृंगा ! तुझी
मूर्ती मिळेना गऽ अशि देउळीं
कां गऽ फुलेना ही चाफेकळी ?

ममतेचा पाऊस खळबळला
चुंबनीं सुखगंध दरवळला
सकळांच्या नयनींची ही बाहुली
हांसेना बोलेना का गऽ मुळी ?

कुरवंडी प्राणांची का गऽ करूं
सुखवूं कसें बाई हें लेकरूं ?
देवा ! हिच्या शिरीं तव साउली
सांभाळी माझी ही सोनसळी !

● ● ●

# दैवगतीस

दैवगती ! एक कृपा-भीक मला घाल
मम जीवनगीताची बदलुं नको चाल
परमकरुण रवि तुझिया ठेवुनियां भाव
सुरसागराचा मी घेत असें ठाव
तृप्तीचे मणिमौक्तिक जे रुळती कंठीं
गीतमिषें गुंफितसें ते तुझ्याच भोतीं
दैवगती ! या वेळीं छेडुनि बदसूर
मम जीवनगीताचा उतरुं नको नूर
शिवसुंदर रूप तुझें प्रकटविण्यासाठीं
उमलविलीं हृदयफुलें मी देठोदेठीं
तैं अमाप स्नेहमधू त्यांतुनि भरियेला
अन् सजलें तरलधुंद गीत-गुंजनाला
दैव-गती ! रुद्ररूप प्रकटवुनी आतां
विरसवुनी जाउं नको मम जीवन-गीता.
कंठबलें सकल सूर एकवटुनि देवी
तव विराटरूपाचीं स्तोत्रें मी गावीं
होइल तैं हिमसदृश हृदयाची वेदी
तोंवरि तूं करि खुशाल नृत्य रसविरोधी
दैवगती ! परि तोंवरि मंदपदें चाल
मम जीवनगीताचा भंगुं नको ताल

• • •

# गजघंटांनो

गजघंटांनो खुशाल डोला
ठणकावित टोल्यावर टोले
जे काळाचे चेले त्यांना
पाजित जा भानाचे पेले.
घंटानादें उठतिल पामर
गुंडाळित आभरणें अपुलीं
उरावरी काळाच्या नाचत
हसेल अमची प्रीत रसेली!
चिन्मयतेची नशा अखंडित
चढे अता आमुच्या लोचनीं
निघा येथुनी नाचा जगभर
भंगुरतेचीं गाया गाणीं.
गजघंटांनो खुशाल डोला
ठणकावित टोल्यावर टोले
जे काळाचे दास तयांच्या
मुखीं धरा भानाचे पेले !!

• • •

# निरोप

घे निरोप एकदाच मंजुवचन बोलुनी
वळुनि पाहि एकदांच मंजुमधुर हासुनी

या अंतिम सुखक्षणांत
नीर नको लोचनांत
प्रीतिगीत एकदाच घे मुखांत घोळुनी

अंगअंग रोमांचित
भावभाव उन्मादित
संगतींत एकदाच घे जरा विसावुनी

जायचें पथीं अनंत
एकाकी तृषित श्रांत
म्हणुनि आज एकदांच हृदय जाइं जुळवुनी

• • •

# मयनगरी

ये जनदृष्टीच्या पैलतिरीं
सुखसुंदर उभवूं मयनगरी

जीवन-हेतु न जनमनरंजन,
विश्वोद्धारक आत्मप्रसाधन
कशास तर मग हें जडबंधन ?
घेऊं नभिं चल स्वैर भरारी.

स्वच्छंदानें स्फुरतिल गानें
मधुगंधानें भरतिल रानें
अवकाशीं फिरतिल सुरयानें
देवतुल्य देखत कारागिरि

नवनवलाचा सुखद सोहळा
करूं साजरा भुलवूं काळा
सुंदरतेच्या दावित लीला
चल रंगूं प्रतिभा-संसारीं !

ये जनदृष्टीच्या पैलतिरीं
सुखसुंदर उभवूं मयनगरी.

• • •

# कुणि तरी

कुणितरी बसावें येउनि मजसन्निध
हळुवार कथाव्या गोष्टी नानाविध
त्यायोगें जाइल उदासीनता लया
अन् मानस-नौका निघेल मुलखा नव्या
कुणितरी म्हणावें मज——मी अति नाजुक
पेलतें कसा भवभार——न त्यां ठाऊक,
जाणीव एवढी देइल प्रोत्साहन
अन् गात्रीं येइल नवजीवन दाटुन
कुणितरी करावें मद्‌गुणसंकीर्तन
नित धीरकृतीला द्यावें आवाहन
विश्वास नवा येईल मनीं उमळुन
मी सरेन पुढती हांसत सरसावुन
कुणितरी पहावें मन्मुखिं टक लावुन
जननान्तरसौहृद दावावें उकलुन
जिव अननुभूतिनें होइल वेडापिसा
अन् हर्षें येइल फुलुन नभासारखा
कुणितरी हंसावें मुक्तहास्य मजसवें
कुणितरी मजसवें ढाळावीं आंसवें
कुणितरी करावी साथ मला दिननिशीं
ही तरीच जाइल सरुनी कासाविशी !

● ● ●

# एकान्त

एकाकीपणाचें भय दाटे मनीं
आसवें लोचनीं साकळती

चहुदिशीं भासे काळोख भयाण
व्याकळून प्राण कंठीं उभे

वाटतें पाहावा कोणाचा आधार
कुठें तरी भार विसंबावा

कोणासंगें तरी स्वैर विहरावें
गोड गीत गावें कोणासवें

कोठें उकलावें मनींचे उमाळे
ममत्वाचें जाळें गुंतवावें

माझ्या वेड्या जीवा मायेची साऊली
कितीकांनीं केली आजवरी

आज अचानक झाली पांगापांग
नुरे मज थांग संचिताचा

• • •

# एक सानशी कळशी—

किती वेळ लाविसी ओढण्या
एक सानशी कळशी पोरी
दिस मावळला तरी न अजुनी
दिवा लागला पुढल्या दारीं

एकामागुनि एक भराभर
रहाटास विळखा दोरीचा
हातांसरशीं खाली वरती
नाच चालला तुझ्या उरांचा

मधेंच धापा टाकित पुससी
घाम भाळिंचा निज पदराला
पुन्हां पुन्हां बघसी न्याहाळुन
वरवर येणाऱ्या कळशीला

नकळे केव्हां वरी यायची
कळशी जलभरली वा अर्धी
तळांत पाणी असे वा नसे
तेंहि कळेना काळोखामधिं

किती वेळ हें असें कळेना
तुझें ओढणें चालायाचें
सांग कधीं तव सुभग करांनीं
तृषितांना जळ लाभायाचें ?

● ● ●

# गीत

दुःखावेगें पीडित माझें
गीत हवें का तुला ?
अश्रुफुलांनीं सजवियलें हें
चित्त हवें का तुला ?

शोकासंगें अनुदिन फिरलों
गळयांत घालुनि गळा
एकान्तीं मीं सदा फुलविला
नैराश्याचा मळा
अमोल असलें कष्टोपार्जित
वित्त हवें का तुला ?
उरांत माझ्या भरुनी राहे
चितेची काजळी
विचारांवरी अश्रद्धेची
पडे दाट साउली
अशा निवाऱ्यामधलें भंगुर
स्वास्थ्य हवें का तुला ?
जिनें कधींही साफल्याची
शीव नसे गांठली
पूर्णाची साउली जियेवर
कधिंहि नसे उमटली
ओसाडीची असली निष्फळ
प्रीत हवी का तुला ?
दुःखावेगें पीडित माझें
गीत हवें का तुला ?

● ● ●

# नजर

कुंडींतील वेली निःश्वासीत होत्या
स्वर्गीयसुंदर सुगंधलहरी,
आकाशवाणीही दिव्य संगीताची
करीत होती गोड बरसात
गृहांत माझ्या

आल्यागेलियासी बोलून हासून
फिरून हिंडून खाऊन पिऊन
शय्यागृहीं आलें सुख सेवावया
प्रगाढ निद्रेचें

मऊ मऊ गादी शुभ्र अंथरूण
जाडजूड मृदु, सावरीच्या उशा
उबदार शाल, भोंतीं छतारलें
मच्छरदानही

करीत शांतीची नम्र आराधना
टेकीलें मस्तक लपेटला देह
तोंच कोठूनशा कटु विचारांच्या
बोचक साउल्या घोटाळूं लागल्या
मनांत माझ्या

३६८३५ ... ९४८६ ... ८।९२।६

जयानें बांधिला हा माझा महाल
जयानें विणिली ऊबदार शाल
ज्यानें पिकविल्या डाळी नी तांदूळ
ज्यानें राखिला हा महाल निर्मळ
तयाचें शरीर ?
शिणलें भागलें
पड्या पावसांत––किट्ट काळोखांत
अर्धपोटी, कोठें––कोठें विसावतें ?
छोट्या खोपटांत कांबळीच्या वरी
पोरांच्या उबेंत
टेकून आपल्या दुडल्या दंडाला
भारावलें शिर
तयाचें शरीर होतें विसावलें !
नव्हता बोलत कांहीं तो कोणाशीं
मात्र रोखूनीयां तांबरले डोळे
पहात होता तो जागा कीं स्वप्नांत ?
कोठें ?––कोणीकडे पहात होता तो ?
याच आवारांत
बागेंत, घरांत, अन्नांत, शय्येंत
माझ्या विचारांत घुसत होती ती
त्याची प्रक्षुब्ध नजर !

● ● ●

# माझे अश्रू

माझे अश्रू सरले—सरले
आर्द्र घनापरि अन् झऱ्यापरी
हृदयामधुनी अन् नयनांतुनि
अविरत झरले—झरले—झरले !

मनोगतांच्या चिता पाहुनी
जेव्हां माझे भाव पोळले
अनाघ्रात हें नवयौवनसुम
धुळींत मिळतां प्राण कष्टले

आकांक्षांची लकेर कंठीं
कोंडतांच अंतर कळवळलें
विनाश अनुदिन निकटिं नाचतां
हास्य तडकलें श्रवण बधिरले

त्या क्षणांतुनी माझे अश्रू
दुःखापासुनि तरले—तरले !
माझ्या नयनीं अतां खेळुं दे
पीडित नयनांमधलें पाणी

माझ्या कंठीं अतां उमटुं दे
मुक्या मनांची अंतिम वाणी
श्रेष्ठ-कनिष्ठाप्रति माझें मन
पुकारुं दे अजि एका वचनीं

मानव्याची निंदा वा स्तुति
मला लिहूं दे निर्भय कवनीं
करुणासागरिं माझे अश्रू
दिसोत मजला विरले—विरले !

● ● ●

# म्हटलें ना, मी येईन!

कधींमधीं येईन मी म्हणतें ना, मी येईन
अतां  कां रे माझ्याकडे पाहतोस रागावून ?
तुझी माझी वाट आतां विभागली वळणाशीं ।
आपुलाल्या घरीं सुखें नको का रे जावयासी ?

तुझा-माझा सहवास जशी नक्षत्रांची माळ
आपदांच्या अंधारांत माझें उजळील भाळ
दिसभर सुखावरी फुलवीन फुलबाग
काळोखांत तुझा गोड आळवीन अनुराग

भृंग-कमळाची जोडी नाहीं होणार आपुली
भाऊ-बहीणीची माया घेऊं शिकून आगळी
माझ्या दारच्या फुलांचा सडा तुझ्या परसांत
तुझ्या बांसरीचा नाद घुमो माझ्या अंगणांत

तुझें-माझें एकरूप  एकजीव जिणें व्हावें
एका मायेचीं लेकरें तसे आपण असावें
तुझ्या मुखीं भरवीन माझा ममतेचा घांस
पदरानें पुशीन मी भाऊ तुझ्या आसवांस

जरी छाया अवचीत माझ्यावरील उडाली
शिरीं माझ्या गोवर्धन धरिशील वनमाळी
आतां पूस तीं आसवें देई निरोप हंसून
दिवाळीला येईन मी—म्हणतें ना, मी येईन !

● ● ●

# वेड

कोठें तरी कांहीं तरी अनुचित कर्म घडे
जयामुळें शहाण्याचें मन होत जाई वेडें
कोठें नालायकीवर फुलें यशाचीं फूलती
सांनिध्यांत पात्रतेस दिली जाते मूठमाती

कोठें आभाळा भिडतो स्वास्थ्यसुखाचा मिनार
पायतळीं धगधगे उग्र श्रमांचा अंगार
कोठें तरी सौहार्दाची झुळुझुळू वाहे झरी
रंगे क्रूरतेची लीला तिचियाच पैलतिरीं

कोठें औदार्याला सांचे घाली अहंतेचें खळें
प्रकाशाच्या बुडीं कोठें सांचें अंधाराचें तळें
कोठें तीव्र उपेक्षेंत उमेदींचें चित्र वठे
कोठें दीर्घ यत्नांवर येती विनाशाची पुटें

कोनाकोपऱ्यांत ऐशा विघटना घडतात
उल्हासाला आंवळते सदा विषादाची तात
न्याहाळतां न्याहाळतां ऐशी अनुचित सृष्टी
गढूळते–भारावते जाणत्याची दूरदृष्टी

• • •

# मम प्रीतीची रीत

तुजसाठीं मीं खुलें राखिलें अनुदिन माझें दार
जरी जाणतों मम प्रीतीची रीत न तुज रुचणार
नसतिल माझ्या जवळीं शालू गाद्या गिरद्या मृदुल
पांघरिण्या तुज लाभेल परी सत्प्रेमाची शाल
झुलविणार मी नाहीं तुजला अलंकार घालून
सतत परंतु प्रसन्न ठेविन चित्त विमल राखून
जागोजागीं आपत्तींचें आढळेल तुज रान
परी पुढें तुज नेइल अपुल्या सहकार्याचें गान
अश्रूंना मी सदैव टाळिन; परी तुझ्या नयनांत—
कधीं न सांठावें जळ, याची चिंता धरिन मनांत
"सखे साजणी प्रिये" यापरी कधीं न बाहिन तुला
तव प्रेमास्तव जरी या जनीं म्हणवुन घेइन खुळा
स्वभाव माझा असा अनोखी कसा तुला कळणार ?
मीच जाणतों मम प्रीतीची रीत न तुज रुचणार !

• • •

# मनांतलें

झरझर सरुनी गेला अवधी
मनांतलें राहिलें मनामधिं,
कधिं न हांसलों, कधिं न नाचलों
स्वैरपणें नच बागडलों कधिं,

नवलविशेषें जरी उसळली
उरांत उन्मेषांची गर्दी,
परस्परांना हुडकित फिरलों
चढतां अनुभूतींची धुंदी,
एकामेकां विसरुनि गेलों
भुलुनी भ्रमुनी जनसंमर्दी,
दुरावतां अजि विरहव्यथित ही
सरतां रात्र सरेना अर्धी,
मनोगतें पुसतीं ' कधि येइल
उद्‌गाराची सुवर्णसंधी ?
जनांत झालें जनासारखें
मनांतलें राहिलें मनामधिं !

● ● ●

# मी उभी या शून्य प्रासादांतरीं !

चांदरातीं माळरानीं जाउनी
बैसलों होतों सुखें भारावुनी
तारकांचे दीप होते तेवते
उजळ अपुले नेत्र होते जागते
शुक्र तारा हर्षलें पाहून मी
मंगळाचा लालिमा तुज मोहवी
गोल ते ? छे, प्रेमचिन्हें आपुलीं
साक्ष कीं प्रीतीस होतीं राहिलीं
रम्य त्या रात्रीं कुठें ? त्यांच्या स्मृती
मात्र एकाकी जिवाला सोबती
आज तूं शतयोजनें प्राणा ! दुरी,
मी उभी या शून्य प्रासादान्तरीं
शुक्र मंगळ अंतराळीं तेवती
लोचनींच्या आसवांना हांसती

• • •

# प्रणयाचीं गीतें

" तूं राजा मम, मी तुझ्या जिवाची राणी "
चल गाऊं घडिभर अपुली प्रेमकहाणी
ही रात्र सरोनी जाइल रसरंगांत !
फुटतांच तांबडें हाकारुनियां नाव
घेशील सहचरा ! दिगंतरा तूं धांव !
रात्रीस उडवुनी प्रणयाचा रसरंग
मज टाकुनि गेला पहाटेस श्रीरंग
जरि रविउदयानें झगमगलें जग सारें
कोलाहलिं स्मृतिचीं धुंडित श्यामल गाणीं
मी हिंडत मिटलेल्या या नयनांनीं !
ही प्रीति, गमलें कल्पलतेचें फूल
ज्या अमरसुखाचें अद्‌भुत फळ लागेल
अमरता कशाची ? स्वप्नच तें काळाचें ?
चिरदुःखाचें तिज जहरी फळ येऊन
कितिकांचें करितें जीवन-वन वैराण !
मीं म्हटलें होतें, " कधीं न मी गाणार
प्रणयाचीं गीतें, मज न अतां रुचणार "
परि ज्या प्रेमानें असें नाडिलें मजला
त्यावरी अखेरी करावया फिर्याद
कवितेस घातली मीं त्वेषानें साद !

# निवेदन

मजवर ठेव सख्या विश्वास
तुझ्याचसाठीं मीं धरिलेली
संसाराची कांस !

बाल्यापासुनी मज जडलेला
मुशाफरीचा गाढ जिव्हाळा
अवचित माझ्या चरणीं पडला
तव ऋजुतेचा पाश !

गमलें सरली इथेंच यात्रा
ग्लानी आली अवघ्या गात्रां
परिसुनि तव प्रणयाच्या मंत्रा
धुंद चढे हृदयास !

सृष्टीच्या अनुविध रूपांतुन
तत्त्व विलसतें जें नितनूतन
तें तुझिया उत्कट स्पर्शांतुन
भिडलें मम हृदयास !

हांक शिवाची अनंतांतली
निर्वाणाची हांक तेथली
जों नच या श्रवणांवर आली
तोंवरि राहिन तव पदकमलीं
करिन सुखद सहवास !
मजवर ठेव सख्या विश्वास !

● ● ●

# कितिदां तरि मी

कितिदां तरि मी तव बाहूंवर
माझें शिणलें शिर टेकविलें
निद्राकांरि भवभार क्षणार्धी
सोपवुनी निश्चिंत जाहलें.
कितिदां तरि मी विसावलें तव
पाषाणापरि अभंग वक्षीं
ऐकत आंतिल भावतटिनिची
मंजुळ खळखळ शीत सुखदशी.
कितिदां तरि मीं तव वाणींतिल
प्राशियलें संजीवक अमृत
तेंवि तुझ्या दृढ आधारें मीं
लंघियले विपदांचे पर्वत.
कितिदां तरि मी लेवुनि बसलें
तव प्रणयाची मृदुतर मखमल
जिच्या स्पर्शनें उरिं घमघमला
कल्पसुमांचा मादक परिमल.
कितिदां तरि मी हांसत खेळत
ताप साहिला तव विरहाचा
दाहें ज्याच्या उजळुनि आला
स्वर्ण-वर्ण अपुल्या प्रीतीचा.
कितिदां तरि मीं तव-पद-सेवनिं
अनुभविली ती असीम शांती
जिच्यांत मज आढळली माझ्या
चिरवांछित स्वप्नांची पूर्ती.

● ● ●

# गृहिणी येथ मी—

गृहिणि येथ मी, हें माझें घर
ये घडिभरि अंतरीं मुशाफिर !

कुण्या गांवचा तूं रहिवासी ?
आज कोणत्या मुलखा जासी ?
असे शिदोरी कीं उपवासी ?
पथि कोणी सांगाती—सहचर ?

ये, आदर हा घांस उन्हउन्हित
वापींतिल घे प्राशुनि अमृत
मंडित करिं ही भू संमार्जित
मातेपरि जी चिर-स्नेहातुर !

सांजवातिच्या मंद प्रकाशीं
करिशिल जरि हितगुजें अम्हासीं
विरघळतिल दुःखांच्या राशी
सौख्यसुधेचे सुटतिल पाझर !

नव्या दमानें खुल्या दिलानें
जाशिल तूं अपुल्या मार्गानें
मम अश्रूंचें अभंग लेणें
लटकावुनि दाटल्या उरावर !

अश्रुफुलांनीं याच रातदिन
मानवतेचें करितें पूजन
मुखांत एकच मंत्रोच्चारण
" गृहिणि येथ मी, हें माझें घर "
ये घडिभरि अंतरीं मुशाफिर !

• • •

# १५ ऑगस्ट १९४७

शोकाचें स्मरण मनीं आणुं नका कोणी
सुखसागरिं सकलांची आज रासन्हाणी
स्वप्नरूप अंधकार होइ पाठमोरा
ये उदया सत्यभानु विश्व फुलविणारा
जयगीतें दुमदुमती दशदिशांमधोनी
शोकाचें स्मरण मनीं ठेवुं नका कोणी
कणकणांत हो प्रदीप्त अग्नि चेतनेचा
नसनसांत ये दाटुन हुरुप अद्भुताचा
जळिं स्थळिं पाषाणिं हीच बिंबली कहाणी
शोकाचें स्मरण मनीं आणुं नका कोणी
हर्षानें धडधडतें हृदय मायभूचें
डौलानें फडफडतें चिन्ह तद्यशाचें
मुक्तीची वागवितें जें उरीं निशाणी
शोकाचें स्मरण मनीं ठेवुं नका कोणी
जनमनांत प्रस्फुरली तान पूर्ततेची
भावसमाधी लागे तींत भारताची
समसमान आज तया निंदास्तुति दोन्ही
शोकाचें स्मरण मनीं आणुं नका कोणी
निज रुधिरें रंगविली भूमि ही जयांनीं
प्राणयज्ञिं आत्माहुति अर्पिली जयांनीं
नेइल हा क्षण त्यांना खचित उद्धरोनी
शोकाचें स्मरण मनीं आणुं नका कोणी
सुखसागर सकलांचीं आज रासन्हाणी !

• • •

# आज घरास यायची—

आज घरास यायची — माझी माउली मायेची
माझ्या संसारावरती — तिची दृष्टी फिरायाची
माझा जीव आनंदानें — आला बाई मोहरून
उत्साहाचें गीत माझ्या — मुखीं आलें ओथंबून.
सारे पसारे ठेविले — आवरून सावरून
घरकुल ठेवियेलें — नटवून सजवून
माझ्या माहेराची रीत — वठवीतें राहणींत
माते ! तुझी शिकवण — आहे माझ्या स्मरणांत.
सानुल्यांना सांगितली — वार्ता अतिआनंदाची
आज बाळांनो, आपणां — आजी आहे भेटायाची
तुम्हांला नि मला आतां — नको काळजी कशाची
माझी मायेची माउली — आहे घरास यायची !
झाली यावयाची वेळ — पाय घोंटाळे दारांत
बाळ उभा फाटकाशीं — दूरवर न्याहाळीत
माझा मलाच देतांना — धीर, काळीज कांपतें
तोंच दुरून टांग्यांत — माझ्या मायेस देखतें
'आजी आली, आजी आली' — झाली हुल्लड घरांत
हळुवारपणें माय — पाय टाकी उंबऱ्यांत
पडो माझ्या संसारांत — माझ्या मायेचें पाऊल
माझ्या सुखसर्वस्वाची — तिला घेऊं दे चाहूल.

• • •

# सुंदरते सखि !

सुंदरते सखि मजला लाविसी लळा
निज सुरम्य कर माझ्या घालिसी गळां
अनुविध रूपें लेवुनि
रंजविसी मजलागुनि
मन्मानसिं नवलांचा फुलविसी मळा.
कोलाहलिं बावरतां
गुंगसि मधु–संगीता
दिङ्मंडलिं भ्रमविसि मज त्यजुनि भूतला
चपलेहुनि तूं अचपल
जलदाहुनि सांद्र तरल
कुसुमाहुनि कोमल तूं स्नेहमंगला !
परिसाया तव पदरव
आतुर मम भाव भाव
जीवविहग तुझियास्तव देहिं राहिला.
सुंदरते तव पायीं
जीवनलय लागावी
तव करेंच मुक्तिलाभ व्हायचा मल
सुंदरते सखि मजला लाविसी लळा !

• • •

# इष्टदेवते— (१९४८)

दीपावलि ! तुज कवनसुमांनीं आजवरी पूजिलें
मनोवांछितें पुरवायास्तव दीनवचें प्रार्थिलें
उत्कट इच्छेचा तुजपुढती धूपदीप लाविला
आशापूर्तीखातर तुजवर भाव अचल ठेविला
आलोचन जागरणांत सरल्या रात्री किति आमुच्या
ओठांतुन कितिकदां उमटल्या तव तेजाच्या ऋचा
घरांघरांतिल स्नेह आपुल्या संपुटांत घेउनी
घडिभर तेवुनि लुप्त होसि गे कोठें दिव्यांगिनी?
पहा आमुच्या पथीं पसरला तिमिराचा सागर
पैलथडीला राहे अमुच्या स्वप्नांचें आगर
तुझ्या प्रकाशमधें अम्हाला सतत वाट काढुं दे
साधनेंत आमुच्या निरंतर साह्य तुझें लाभुं दे
द्वैताचा घेऊन बळी तूं प्रसन्न हो कालिके
समतेचा भक्तांना वर दे हे तेजोवल्लिके
स्नेहातुर जीवितीं आमुच्या प्रखर तेज जागवीं
महामंत्र शांतीचा अमुच्या अंतरंगि नादवीं
इष्टदेवता तूंच आमुची सुभगे दीपावली
तुझ्या कृपेस्तव आसावलि बघ ही भारत माउली !

• • •

# कसलीशी घडी आली—

कसलीशी घडी आली वाजवीत अलगूज
अलगूजें उकलिलें मुक्या मनांतलें गूज
शब्दपुष्पांना लाभला गंध नूतन सुबोध
भावपक्षांना लागला कल्पकोटरांचा शोध
एकाएकीं पालटली माझी शून्य अन्तःसृष्टी
कसल्याशा जाणीवेची तिजवर झाली वृष्टी
धुकें खिन्न मावळलें उजळला तमःपट
साऱ्या जागत्या रात्रींचा झाला सोनेरी शेवट
मनोरथावरी आला ध्येयसूर्य झळाळत
तेज तयाचें फांकलें साऱ्या देहांत-मनांत
माझ्या अंतरीं उदेली कोटी दीपकांची प्रभा
माझ्या स्वप्नीं उभारली सत्सुखांची इंद्रसभा
देवा ! माझ्या मुखीं आज मंगलाचा मंत्र घाल
मात्रा हेमगर्भाची द्या माझ्या क्षीण जीवितवाला
कसल्याशा घडींत ये माझी तपस्या फळास
रसग्रहणाएवढी द्या हो उसंत जिवास !

• • •

## भावपुष्प

मनांत आलें तेंचि गाइलें
मज न कुणाचें भान राहिलें.
        किरण रवीचे, गंध फुलांचे
        रंग मनोहर दिशादिशांचे
        नाजुक नर्तन जललहरींचें
या सकलांनीं मजसि मोहिलें
मज न कुणाचें भान राहिलें.
        सुरेल सुमधुर कंठ नसोनी
        अवगत नसतां रागरागिणी
        गुंगत विहरत जनीं, निर्जनीं
गीत भाबडें रचुनि पाहिलें
मज न कुणाचें भान राहिलें.
        रिझवित मृदु हृदयें रसिकांचीं
        स्नेह, पिपासा शमवित मनिंची
        वेल वाढवुनि उरिं सु-रसाची
भावपुष्प मीं जगा वाहिलें
मज न कुणाचें भान राहिलें.

• • •

# चंद्रकोर हांसे

अंबरांत नाजुकशी चंद्रकोर हांसे
मंदिरांत कां ग सखे सोडिसी उसासे ?
कुस्करुनी टाकिलीस माळ ही कळ्यांची
चालविली उघडझांप नेत्रपाकळ्यांची
मोकळाच केशपाश वसन तुझें साधें,
कां धरिसी हरिवरती मधुरुसवा राधे ?
अंबरांत नाजुकशी चंद्रकोर हांसे.
कंसदमन करण्या हरि मथुरेला गेला
येइल परतूनि खचित घेउनि जयमाला
रथ दारीं राहि उभा, कोण गे तयांत ?
आण गडे पंचारति, आले यदुनाथ
आले यदुनाथ सखे आले यदुनाथ
प्रणयसागरावरतीं रमणिहृदय नाचें
अंबरांत नाजुकशी चंद्रकोर हांसे.

● ● ●

# न कळतां निघून जा

जायचें असेल जरी. . . न कळतां निघून जा !
न कळतां निघून जा ! !

फूल फूल हुंगितां
चांदण्यांत गुंगतां
देहभान हरपतां खुशाल मजपुढून जा !

केशपाश सोडुनी
त्यांत वदन झाकुनी
रुसुनि बैसतें तदा लपत छपत दूर जा !

गान गायिल्यावरी
बीन सारुनी दुरी
थकुनि नयन झाकितें त्या क्षणीं उठून जा !

क्षणिक जायचें असें
लागुं दे तुला पिसें
विरहिं मीलनीं सुखें मजसि गुंगवून जा !

आणि जर अखेरचें
तुज असेल जायचें
जात जात पदतलीं प्राण हे चुरून जा !

जायचें असेल तरी न कळतां निघून जा !

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. नं. ११८६५

# माझेंच भावगीत

आकाशवाणिमधुनी घुमतां उभ्या जगांत
मीं ऐकिलें दुरूनी माझेंचि भावगीत.
सर्वस्व ओतियेलें मीं एकदां जयांत
तें ऐकिलें दुरूनी माझेंचि भावगीत.

तुजवीण प्राण माझे दिनरात्र कोंठि यावे
कधि भेट व्हावयाची तें ठाउकें नसावें
परि जीव हा भुकेला तुझियाकडेचि धावे
हें गीत गात नाथा रूपीं तुझ्या विसावे
या आर्त भावनेनें तुज बाहिलें जयांत
तें ऐकिलें पुन्हां मी माझेंचि भावगीत

गेली सख्या अतां रे ती वेदना सरोनी
पडले निवान्त देहीं मम प्राणही थकोनी
स्वर ते मुके जहाले, विसरून शब्द गेले
वाणी मिटून गेली, ते भावही निमाले
ध्वनिमुद्रिकेवरी तें परि गीत ऐकतांच
भडका उडून गेला क्षणमात्र अंतरांत
क्षण एक जीवघेणी झाली सजीव प्रीत
मी ऐकितां दुरूनी माझेंचि भावगीत.

● ● ●

# मोगरिचे बहर

मोगरिचे बहर आज सुकुनि चालले रे
उरला अपुराचि हार
वीणेची तुटत तार
सहवेना विरहभार मन उदासलें रे.
उत्सवांत रमति कुणी
गाती मधुगीत कुणी
मीच मात्र आंसवांत न्हात राहिलें रे
रोहिणीस धरुनि करीं
विहरतसे चंद्र वरी
वेडावुनि वरुनि तयें मजसि पाहिलें रे
ऋतु वसंत दशदिशांत
प्रणयिजनां तोषवीत
वैऱ्यापरि मज त्यानें झुरत ठेविलें रे.
ये धांवत प्रिय सखया
रिझवाया—सुखवाया
तुजवांचुन अतिव्याकुल प्राण जाहले रे,
मोगरिचे बहर आज सुकुनि चालले रे.

● ● ●

# तिकडली स्वारी

तिकडली स्वारी घरास यायची
उडे तारांबळ माझिया जिवाची
कोनाकोपऱ्याची धूळ झटकली
घरास दारास निर्मळता आली
निर्मळता आली तनूला मनाला
प्रतीक्षेचा शीण क्षणीं हरपला.
गोड पक्वान्नांच्या संगें बोल गोड
बोलेन, ऐकेन, लागलीसे ओढ
रचियली शेज सफेत, सुंदर
उशाला ठेविले मोगरीचे हार.
घरांतले सारे दीप मालवीले
उभी मी सज्जांत शिणवीत डोळे
रहा तारकांनों अशाच तेवत
एकाकी पांथाला तुमची संगत
चढे जाळींतून चंद्रमा आकाशीं
मनांत सांठल्या गुपितांच्या राशी
किती किती राया वेळ लाविलात
माजलें काहूर मनांत – देहांत !

• • •

# तुझ्या प्रीतिची गाथा

अनुरागामधिं आळवीन मी तुझ्या प्रीतिची गाथा
कथेन हृदया ताल धराया, ये परिसाया नाथा
तुझ्या प्रीतिची गाथा.

नभांगणीं तूं मला दाविली शोभा समरसतेची
जलाशयीं शिकविली मला तूं किमया प्रतिबिंबाची
तूंच मला लाविलें गावया माझ्या प्रणयवसंता !
तुझ्या प्रीतिची गाथा !

मेघ सावळे खेदाचे तव झाकळतील मनास
रजतवर्ण स्वरमाला माझ्या किनारतील तयास
झरतिल झरझर जीवनधारा, फुलेल, वसुधामाता,
तुझ्या प्रीतिची गाथा !

जग हसलें तर हंसो, आपणा अपुलें मीलनगान
चल ये राया, सवें विहरुं या, डुलवूं रानोरान,
डुलेल वारा, डुलतिल तारा, चंद्र डोलविल माथा
तुझ्या प्रीतिची गाथा.

अनुरागामधिं आळवीन मी तुझ्या प्रीतिची गाथा.

• • •

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ३९८३३ ..... दि: ८।१०।८५
क्रमांक ९५८६ ...... नों दि: ८।१२।

## गीत नव्यानें

गीत नव्यानें गावें म्हणशिल,
कल्पनेस दे नवीन उजळा;
वृत्तींना दे नवा फुलोरा,
भावनांस अन् नवा उमाळा !

दाव दृष्टिला नवीन क्षितिजें
जेथ विजेची चमक नवोनव;
श्रवणावरतीं आण अनावर
नव्या युगाचा नवीन गौरव !

बाहूंना बल, जोम पदांना,
ओढ सिद्धिची संकल्पांना;
गीत नव्यानें गावें म्हणशिल,
प्राण नवा तर दे शब्दांना !

• • •

# कळा

त्या स्थलींच, त्याच क्षणीं,
त्या वचनीं, त्या नयनीं,
तें दर्शन घडलें मज
त्या रूपीं अवतरुनी !

गिरिकंदर, वृक्षराजि,
सागरतल, वाळूरण,
काळरात्र, धूलिपटल,
कर्णकटू घनगर्जन—

या सर्वां आडुनियां
खुणवित तें रूप मला;
पाहुं तरी कशी ? किती ?
कुठवर या साहुं कळा ?

• • •

# भिंतीवरतीं

भिंतीवरतीं लटकत राहे
एक गोमटी चंदनपुतळी;
लावण्याची तिच्या नव्हाळी
अंगप्रत्यंगीं मुसमुसली.

स्कंधावरतीं एकतार अन्
कमलपुष्प घे उजव्या हातीं
तृणपात्यांतुन लकेरीपरी
हुंगत, गुंगत फिरत जाय ती.

गालीं स्मितहास्याच्या रेषा,
मुरड बोलते अधरावरली ,
" मी कवि-प्रतिभा अद्‌भुत, अस्थिर,
मी नच केवळ चंदनपुतळी ! "

एकान्तीं निःशब्द निरामय
चाले अमुचें सहसंवेदन;
मी संसारीं, ती फलकावरि
बंदिस्त तशा निसंग, उन्मन !

गात गतीचें गीत अगतिका--
ती मधुरा---नांदे मजजवळी;
जननान्तरिच्या ऋणानुबंधित
मी आणिक ती चंदनपुतळी !

● ● ●

# उ त्त र !

दहा जणांच्या या खड्या पहाऱ्यांत,
गृहकृत्यांच्या या राड रगाड्यांत,
विसरून जातें मी माझी मलाच.
व्यवहाराच्या बुरख्यामध्यें
जातो लपेटून माझा मनोदेह,
शरीरहि जातें भुकेखेरीज सारें विसरून.
राबणें, खाणें, विसावणें,
याहून नाहीं निराळें जिणें.
पण रात्रीस---
थांबतो कल्लोळ; लागतो सूर.
बधिरता जाते, येते हुर्हूर.
आणि उकलतो
जीवनविश्वाचा बंदिस्त गाभा !
तुझ्यांतील बेफिकिरीदेखील
निघते न्हाऊन संध्यासरोवरांत स्नेहार्द्र--उन्मन !
शेजघरा येते गोकुळाची कळा;
लागतो घुमाया प्रणयवेणूचा आकुल सूर !
श्वासांच्या तालांत धरूनिया फेर
नाचतों आपण नव्या रासलीला.
थांबून मध्येंच
बेहोष नेत्रांत बिंब पाहतांना
पुसतें मी तुला--" खरेंच कोणाचा,
माझाच ना तूं, अगदीं माझाच ?"
लोपतें अंतर,
--मिळतें उत्तर !

● ● ●

# हें इथें उमलतें

हें इथें उमलतें फूल, त्या फुलावयाचा छंद;
या पसाऱ्यांत नित्याच्या किति दुर्मिळ दुर्मिळ गंध.

हे भुरभुरणारे केश, हा तंग मुलायम वेश,
हे हसरे हसरे डोळे, चालींत मूर्त आवेश.

हे लबाड इवले अधर, त्यांतिल ही मधुमधु भाषा
आशयांत मुग्ध सखोल जाणत्या मनाची आशा.

मी क्षणाक्षणाला टिपितें हे आंसू अन् हें हांसूं
प्राणांत झेलुनी घेतें या जीवाला जिज्ञासू.

माझेंपण मजला कुठलें, या फुलांत मी लपलेली ?
लोपण्यांत सार सुखाचें, ज्याखातर मी टपलेली.

• • •

# माहेर

माझ्या माहेराची वाट
पानाफुलांचीं, फळांची,
मखमली हिर्वळीची !
माझ्या माहेरचें घर--
घर परमानंदाचें,
जसें गोकुळ नंदाचें !
माझ्या माहेराची रीत--
रीत ऋजु वळणाची,
स्नेह आणि सौजन्याची !
माझ्या माहेराची कीर्त
लोकीं दुर्मिळ दुर्मिळ;
कस्तुरीचा परिमळ !
माझ्या माहेराचा मान
वडिलांनीं वाढविला;
आम्हांहातीं सोपविला !
माहेराची फुलवात
सासराचें नीरांजन;
प्रकाशाला आमंत्रण !

• • •

# ती आशेची कळी

निळ्या पर्करावरी काढिली
वेलबुट्टि पांढरी,
सुसाट माळावरी धावते
पोर एक गोजिरी.

केश मोकळे, भाव मोकळे,
कर कवळे नाचवी,
त्या माळाला जणुं स्थिरतेच्या
शापांतुन वाचवी.

जडता देहीं, जडता चित्तीं,
उभि मी परसामधें;
नयन मात्र अस्वस्थ धावती
घडिघडि माळाकडे

ती आशेची कळी पाहत
वाटे मज सर्वदा,
अजुनी नाहीं मानवतेची
सरली सुखसंपदा !

● ● ●

# माझें-तुझें

माझा ओठांतला बोल,
तुझी आंतड्याची ओढ;
माझी नीरस करणी
तुझें ओलावतें वेड !

माझी विसराची रीती,
तुझे वेढणारे हात;
माझी मिणमिण वाती,
तुझी प्रज्वलित प्रीत

माझी सुस्तावली भूमी
फुलें फुलविते चार,
तुझें आभाळ वर्षेचें
धरी समृद्धीची धार !

माझें-तुझें सारें कांहीं
असें विषम-वेल्हाळ;
माझी चंचल मासोळी
तुझें अनिवार जळ !

• • •

# आग

तुझ्या नि माझ्या भेटीची
आशा नुरली प्रत्यक्षांत;
आठवणींच्या हाकेनें
जागवुं बघतें तिज दिनरात.

तुझ्या आगळ्या मूर्तीशीं
जनीं न मज साधर्म्य दिसे
छायाचित्रामधिं न तुझ्या
चित्ताचें चतन्य वसे !

कधिं बाळाच्या उद्‌गारीं
ऐटबाज बांध्यांत कधीं,
भास तुझा होतो अधुरा
छकुल्याच्या जावळामधीं !

भास कशाचा ! ती ठिणगी
उरीं धुमसते--धगधगते,
हें जळणारें जीवन अन्
स्मरणासहि जाळित सुटतें!

● ● ●

# सुट्टी

लागे सुट्टी !
मुलें पळालीं कशीं अन् कुठें !
इथें राहिला घरदाराचा
रिता पिंजरा !
भकास दोघे राखणवाले
सुखसंसारीं !
" बसुं झोल्यावर ?"––" गडे नको ना !"
" खमंग कांहीं, गोड जोडिला
बनवुन दोघें फक्कड जेवूं ?"
––घांस गिळेना !

" ही चटणी, आवडती बाळाची,
हा रस्सा, किति प्रिय बेबीला;
आणि शिरा, जीव पांखडी ताई त्यास्तव!
माझीं बाळें, परक्या ठायीं
कांहीं खाती, कशीं झोंपती"––
––घांस गिळेना !

अर्ध्या ताटावरुनि उठावें,
उंबरठ्यावर घोंटाळावें,
बघत रहावें अंवतींभंवतीं,
झाडाखालीं, नदीतटावर,

नाहीं किलबिल,
सारें निश्चल,
रिता पिंजरा घरदाराचा––
जसा सहारा !

# घर

माझ्या घराच्या समोर
नजरेच्या आटोक्यांत

तुझें मंगलाचें घर
उभें ठाकलें डौलांत.

तिथें सकाळ रंगते
नामगानीं, संमार्जनीं

शंखचक्र–गोपद्मांच्या
रंगाकृती-आलेखनीं.

तिथे किल्बील, झुळ्झुळ
पांखरांची, वात्सल्याची,

वचनांत, भोजनांत
गोडी पांची अमृतांची.

तिथे असंतोषासाठीं
आर्जवाचें सिंहासन

गाढ स्नेहभावासाठीं
अगत्याचें आमंत्रण.

तिथें कणांना, क्षणांना
संस्कारांचा फुलवरा

सुंदराच्या भाळावर
शुचितेचा बिजवरा.

तिथें उमेसाठीं नित्य
होतो शंकर तपस्वी

मनोमीलनांत तेथें
एकरूप स्वर्ग-पृथ्वी.

असें नित्य घेतां घेता
तुझ्या घराचें दर्शन

नवरसीं नाहतात
माझे भावुक लोचन.

● ● ●

# ओढ सांवळी

तोंड वासुनी मला गिळाया
भिंती चारहि उभ्या समोर;
अंधारीं पण दिसति न मजला
मुखडे त्यांचे लालस-घोर !
चराचराचें असीम मार्दव
अंधारीं जाणवे मला;
अंधारीं श्रवणावर येई
अमरत्वाचा गोड गळा !
पहांट होई प्रगट; त्या क्षणीं
अंधाराचें सख्य सरे,
छळिती मज भिंतींचे मुखडे
शोषित माझें रक्त पुरें !
हेटाळत काळोख कोंवळा
प्रकाशास जग पूजितसे;
खुळ्या जगाचा ध्यास पांढरा,
ओढ सांवळी मला रुचे !

• • •

# तूं आणि मी

सख्य कुणाशीं ?——एक तुझ्याशीं;
द्वैत कुणाशीं ?——तेंहि तुझ्याशीं.
उरीं फुले अनुराग——तुझ्यास्तव;
विराग उसळे——तोहि तुझ्यास्तव.
नजर सदा मम तुझ्या ध्रुवावर ;
चरणगतीला तुझाच आवर.
उणें-अधिक या जिण्यांत जें जें,
तुझ्या सुखाचे त्या दरवाजे.
तुझ्या नि माझ्या अचल मीलनीं
क्षितिजमनीं नभ-सागर-जुळणी
काल तूं नि मी, आज तूं नि मी,
उद्यां तूं नि मी, सदा तूं नि मी.
सर्वस्वाची अशि उठाबशी
प्रतिजन्मीं मी खेळें तुजशीं !

● ● ●

# ऋण

माझी हांक ऐकुनियां तूंच धावूनियां यावें,
सारें अवजड ओझें शिरीं वाहूनियां न्यावें.

माझे भाव कोमेजतां तूंच शिंपावीं आंसवें;
रससुगंधाचे भार शिरीं आनंदें झेलावे.

माझा राग शमवाया तूंच बनावें कोमल;
माझ्या दुर्बलतेसाठीं अंगीं सांठवावें बल.

माझ्या बोलांसाठीं सूर तूंच घोळवावे कंठीं;
स्फूर्तिसाठीं उकलाव्या अंतरींच्या गुजगोष्टी.

माझें जगवाया जासी तूंच तुला विसरून :
माझें मागील जन्मींचें कारे फेडितोस ऋण ?

● ● ●

# नको ताटातुटी!

निरंतर आहों आपण एकमेकांसाठीं :
जन्मजन्मींच्या या गांठी; नको ताटातुटी.
माथ्यावरलीं कुरळें आतां नाहीं राहिलीं काळीं
गालीं, भाळीं, इथें तिथें सुर्कुत्यांचीं जाळीं;
आतां माझी आहे नाहीं गालांवरली खळी;
ओसरून गेली आहे अधरांवरली लाली.
मला सारें दिसताहे, सारें कळताहे;
तरी उरीं आकांक्षेचें फूल फुलताहे,
वाटताहे, अजून झटूं आराधनेसाठीं :
जन्मजन्मींच्या या गांठीं, नको ताटातुटी!
" स्थित्यंतरें झालीं किती, तरी स्थिर राहूं;
विकसत्या जाणीवेनें जगाकडे पाहूं;
गावयाचें तेंच गीत जीवेंप्राणें गाऊं;
सहायाचें भलेंबुरें सुखेनैव साहूं."
तुझी-माझी प्रतिज्ञा ही आज स्मरताहे,
संचिताचें देणें-घेणें मज रुचताहे,
कळताहे तेज उभें तिमिराच्या पाठीं :
जन्मजन्मींच्या या गांठी, नको ताटातुटी!

• • •

# मौन

नितळ मुक्यानें वाहे पाणी,
वृक्ष मुके तीरावर दोन्ही;
निमुट तरंगति वरति पांखरें,
मुकें निळें नभ, मुकेंच वारें.
सळसळतांना ऊंस थांबला,
मुकाट मागें डोंगर बसला;
मुके मधुप, जग मुकें येथलें,
काळोखाचीं मुकीं पाउलें.
मनांत असुनी कांहींबाहीं
मूक उभीं आपण दोघेंही !

● ● ●

# जीवनलहरी

: १ :

एक जरी ओळ मला स्फुरली दिवसाकांठीं,
म्हणतें मी——धन माझ्या खचितचि पडलें गांठीं.
ही माझी कोंडाकणि
सेवुनियां क्षुधित कुणी
आशेचें बी पेरिल मानवतेच्या कांठीं !

: २ :

जगता, मज भान नसे मुळिंहि तुझ्या हसण्याचें;
काय कथूं ? भान नसे मज माझ्या असण्याचें.
जगतां बेफाट जिणें
पडतें मज विश्व उणें;
जडतें अन् वेड मला शून्यामधिं वसण्याचें.

३ :

गाण्याचें गोड वेड दिवसभरी मज जडलें
जें सुंदर त्यावर मी गाणें गुंफित बसलें
माध्यान्हावरतीं मी
गाणें रचिलें नामी,
अवगणुनी नकळत जग क्षुधित श्रांत बसलेलें.

: ४ :

जीवनलहरींवरतीं तरळावें, वाटतसे
बिलगावें विलगावें, ही आशा दाटतसे !
गुंगत—जीवन जीवन
फिरतें मी लोभावुन;
माझ्या शिरिं आरोहुन तें सुसाट दौडतसे !

: ५ :

स्नेहाचे कुंभ सतत या हातीं खेळविले,
प्राशुनि आकंठ किती इतरांवर वर्षियले.
या ग्रीष्मीं एकांतीं
तळमळतां दिनरातीं,
स्मरणाच्या मृगजळांत न्हाणें तितुकें उरलें !

● ● ●

# जीवन

जीवन झरझर सुकत चाललें
जिरल्या अवखळ लाटालहरी
कुमुदांचे तर केसर गळले
पिचलें मानसपृष्ठ बिलोरी.

मालवल्या संध्या नि उषा अन्
अंतराल जाहलें पारखें
भूपृष्ठांतुनि उमळ उठे वर
वरचें जग तिज झालें नवखें.

क्षितिजीं बुडली चैतन्यकला
अंतरली सुषमेची संगत
अर्ध्या वाटेवरी अडकला
अभिनवतेचा कलाकुशल रथ.

जीवन झरझर सुकलें गेलें
वर्तमान भूतांत मिसळुनी;
काजळल्या अवकाशीं निश्चल
भविष्य पडलें गाढ झोपुनी !

• • •

# खूण

या शब्दांनीं मला खुणविलें
प्रथम आपुल्या सवें यावया;
आपुलकीनें वाहुनि नेली
अंतरांतली हिरवी माया.

यांच्या नादानेंच बहरला
द्राक्षवेलिचा मनांत मंडप;
यथासांग यांनींच करविलें
मधुररसाचें जनांत वांटप.

या शब्दांनीं मला दाविलें
भावार्थाचें विराट राऊळ;
सुलभ पदांनीं त्यांत फिरविलें
घडिघडि अर्पित मज अपुलें बल.

हेच शब्द मज आज सांगती
अपुल्यावांचुन पुढें जावया;
निःशब्दांतच दडली म्हणती
परमार्थाची गहिरी माया!

• • •

## खोड

सदाचेंच आहे माझ्या खुलें दिलाचें कवाड;
सदाचीच आहे उभी गूढ कामनांच्या आड;
सदाचें ओठांवरी आहे आरतीचें गीत;
सदाचीच माझी अशी वेडिपिशी चालरीत.
जीवनांत सदाचेंच जाळें आहे टाकलेलें;
सदासदा गुंततात त्यांत किती मीन भोळे.
सदाचीच परी तुझी खोड क्षग गुंतण्याची;
तीर जवळतां, वेगें निसटून जावयाची !

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळगत.
अनुक्रम 32833 वि: काव्य
क्रमांक २५६६ नों दि: ८/१२/६१

# स्नेहतत्त्व हें

कुणी कसेही हसले, आणिक
आपसांत कांहीं कुजबुजले,
पडायचें ना त्यांमधि अंतर
दोन जीव जे एक जाहले !

अडवितील मधि खांचाखळगे,
चढण उंचशी कधि वाटेवर,
निर्मळ ओहळ आपुलकीचा
पुढेंच जाइल तसूतसूभर !

भावफुलें हीं अगदीं साधीं;
रंगगंध त्या नाहीं अद्भुत,
सौंदर्याच्या रक्षणार्थ परि
आत्मसमर्पण करितिल हासत !

दाहकतेंत न सुकावयाचें,
अंधारीं नच छपावयाचें;
स्नेहतत्त्व हें असेंच अक्षय
मनांमनांतुन विलसायाचें !

• • •

# पारिजात

असा कसा पारिजात
वाढलेला वाटेवरी;
पहांटेच्या शुभ वेळीं
ढाळी आंसवांच्या सरी !

असे कसे लोक तरी
येती जाती मागें पुढें;
पायतळींच्या मोत्यांचें
त्यांना पडे ना सांकडें !

आणि मीही अशी कशी
आंसवांनीं वेडावतें;
सावलींत असूनही
अशी उन्हांत जळतें !

• • •

# नाद

सहज जुळविले शब्द, त्यांतुनी
   सहज खुले अर्थाची माया;
सहजच होत्या सिद्ध भावना
   त्या शब्दांना वेधुन न्याया.
जिण्यांत होती रसरसलेली
   मस्ती सहजपणाची मोहक;
उद्रेकांतुन जिच्या उसळलें
   सहजपणें वर प्रतिभामौक्तिक.
दोन हात नियतीसह करितां
   ताठा सहजपणाचा गळला;
वठली मस्ती, जिरलें मीपण,
   कर्तृत्वाचा पूर उतरला.
जीवनेंच मम मौक्तिक गिळलें;
   कशी कुठें फिर्याद करूं मी ?
रित्या शब्दशिंपांचा निष्फळ
   वृथा कशाला नाद धरूं मी ?

● ● ●

## कधीं कधीं

कधीं कधीं पथि कातरवेळीं
अनिमिष दर्शन, मधुसंवेदन;
कधींमधीं एकांतीं कंपित
स्निग्ध करांचें हस्तांदोलन
कधींमधीं हें घडतें; तरिही
कायेवर रोमांच सदाचे;
उरांत आणिक अक्षय ठोके
कधींमधींच्या आठवणींचे !

● ● ●

## माझ्या आशा

हवे वाटले पंख रुपेरी
रुप्यांत घ्याया झेंप पांढरी;
हवी वाटली सुवर्णचंचू
सूर्यफुलीं रोवाया अधिरीं.
धवळ्या पिवळ्या माझ्या आशा
काळ्या मातीत रुतल्या; तरिही
हिरव्या पात्यांमधुनि निघाल्या
गात भरारत दिशांत दाही !

● ● ●

# आभाळ

सारें कांहीं जमलेलें
    कसें विरसून गेलें ?
आज अचानक कां रे
    असें आभाळ भरलें ?

फुलूं पाहणाऱ्या कळ्या
    गेल्या मिटूनियां कोषीं;
हलं पाहणारें जळ
    स्तब्ध राहिलें तळाशीं !

स्थिरावली पानांतच
    धीट गिर्की पांखराची;
दडे लकेर चोंचींत
    भीती घेत आभाळाची !

● ● ●

# तीच काय मी ?

तीच काय मी, तुझ्या पथावर
जिनें पसरिली छाया,
तुझ्या पदींचा दाह साहुनी
जिची डंवरली काया ?

तीच काय मी, जिनें चोरिली
जाग तुझ्या चिंतांची,
मिटल्या नयनीं तुझ्या फुलविली
माया स्वप्न-फुलांची ?

तीच काय मी, जिची रागिणी
तुझ्या बिलगली कवना ?
तीच काय मी, श्वास जियेचा
तुझ्या स्पर्शला प्राणा ?

तीच काय मी ? दुजीच अथवा
आज इथें एकांतीं
अश्रूंच्या डोहांत विझवितें
धगधगत्या स्मृतिज्योती ?

● ● ●

# नाहीं आतां

नाहीं आतां ठवणार
मोहपाशीं गुंतवून
नाहीं कांहीं मागणार
मीच आपुली देईन.

नाहीं घालणार मनीं
वियोगाचा ताळमेळ;
नाहीं पुसणार कधीं
पुनर्भेटीचा सुकाळ.

नाहीं ओठीं आणणार
शल्य मनीं सलणारें;
नाहीं नेत्रीं दाविणार
भाव मनीं झरणारे.

वेदनेच्या कांटचांमधें
प्रेमपूर्तीचा गुलाब
कांटचांविण फूल हातीं
असा घडवीन लाभ !

• • •

" हे असेच असतिल हातिं आपुले हात;
ही अशीच राहिल रम्य रेखली वाट;
हा असाच राहिल थाट रुपेरी वरचा ;
ही अशीच किलबिल; हाच जोम चरणांचा !

ऋतु हाच जगीं; मार्गात सोबती हेच;
नवबहर फुलवितिल आशातरु असलेच;
शीतोष्ण झरे हे असेच अनुभूतींचे;
हीं अशींच अधरीं सुंदरतेचीं गीतें !

हीं अशींच पानें मम जीवनग्रंथाचीं;
अन् पानोपानीं हीच कथा--तृप्तीची ! "

या स्वप्नावरतीं मी अनुदिन अनुरक्त;
तें दूर तरळतें अनिर्बंध अव्यक्त !

● ● ●

# क्षितिजावरतीं

दिसभर संगें संगें असुनी
मला वाटतो दिनमणि परका;
रोमांचफुलें फुलवी तरिही
स्पर्श तयाचा मला अनोखा.

निद्रेमधुनी, स्वप्नामधुनी
अमृतरस पाझरवी गात्रीं,
वाटे मजला चंद्रमाच तो
युगायुगांचा मम सहयात्री.

एक हात रविकंठीं ठेवित,
दुसरा गुंफित चंद्रकरांतुन,
श्रांत उभी मी क्षितिजावरतीं
कधीं उषा, कधिं संध्या होउन !

● ● ●

## इथें

इथें ऐकिली हाक दिली जी
        गंधवतीनें समीरणाला;
इथें निरखिला जलवंतीचा
        नीरव अवकाशासह चाळा.
इथें वेढिलें स्वरलहरींनीं,
        निःश्वसितांनीं, स्पर्शफुलांनीं,
अर्धलाजऱ्या जाणिवेस अन्
        इथें दुखविलें मदनशरांनीं.
इथें स्वर्ग माझ्यास्तव झुरला;
        त्रिकाल हसलें क्षितिज मजसवें;
इथें नियतिनें मोजियले अन्
        अदृष्टांतिल निखळते दुवे.
इथें लागला थांग नभाचा;
        उलगडली ताऱ्यांची भाषा;
गहन तमाच्या तळांत बुडतां
        उरिंची अचपल विद्युत्‌रेषा
इथेंच घुसमटला ती वळुनी
        पाताळांतरिं शिरली निथळत;
अजुन इथें हें विवर मनाचें
        जळत्या गीतरवांनीं नाहत.

● ● ●

# गांठ

धरेंत   काळी रात्र असावी;
उरांत   काळी खंत असावी;
परंतु काजळकांठावरतीं
तुझी मनोरम मूर्त असावी.

झांकळलेल्या अवकाशामधिं
तुझी रुप्याची झांक असावी
कडाडत्या घनगर्जनेमधीं
तुझी सुकोमल हांक असावी.

काळरात्रिच्या पदयात्रेला
पूर्वेकडली वाट असावी;
ओघळणाऱ्या स्मृतींस माझ्या
तुझी खुणेची गांठ असावी !

● ● ●

# थाट आगळा

अवर्षणांतुनि सुटुनि अचानक
अशी सुखानें न्हातें न्हातें;
कंठांतुनि झिरिझिरी सांडतीं
परोपरीचीं परिमलगीतें.

कधीं पदतलीं विभ्रम हिरवा;
क्षितिजावर कधिं कवन केशरी;
विराट काळच्या तंद्रीवर कधिं
स्वप्नांची चमचम चंदेरी.

थाट आगळा असा, तशांतच
नांव तुझें रसमय अधरावर;
या स्वर्गाची येइल का कधिं
कल्पनेंतल्या स्वर्गाला सर ?

• • •

# असें न व्हावें

असें न व्हावें--
हसें अहेतुक पाहुनि मम तूं
अति आशेनें उरीं फुलावें;

असें न व्हावें--
बेसावध बोलावर मम तूं
धुंद झुलावें,

असें न व्हावें--
संध्यारंजित आकाशीं तूं
मला पहावें;
जळवंतीचें गीत निळें तूं
मलाच गावें;
अन् वासंतिक परिमलांत तूं
मज वेढावें;

असें न व्हावें--
ध्यासांतुन, भासांतुनि मम तूं
तूं न रहावें !

• • •

# असलें वादळ—असली शांती

अखेर सरलें कराल संगर
म्यानबंद झाल्या तलवारी;
सूर सनइचे घुमूं लागले,
निमुट राहिल्या कर्ण-भेरी !
सरलें संगर, विरलें वादळ,
धूळ थकुनियां बसली खालीं;
जिथें उडालें छप्पर तेथें
पुन्हां लागली पडूं सांवली !
सीधी झाली भुवइ वांकडी,
शब्द गिळाया मिटला जबडा;
विद्वेषावर पडली चादर
जो फिरलेला नंगा-उघडा !
घरोघरींच्या अजाणतेला
मिळे खेळण्या एकच अंगण;
वळवळलेल्या भुकेस लाभे
तुकडा तुकडा चतकोरांतुन !
असलें वादळ, असली शांती,
कृतिनंतर ही अशि विश्रांती;
"इष्टक्रम हा" म्हणत—जाहली
मग्न चिंतनीं माता नियती !

• • •

# म्हणूं कशाला ?

म्हणूं कशाला येइन फिरनी.
सदाचीच जर आलें आहें;
रूप तुझें नजरेंत नवोनव
सदाचीच जर ल्यालें आहें;
स्फूर्तीचा पारिजात अक्षय
तुझ्या सुशोभनिं रमतो आहे;
गंधित जीवितधूप अखंडित
तुज आकारत भ्रमतो आहे;
स्वरभावांचा धागा अविरत
तुझें प्रभूपण विणितो आहे;
अहंभाव तव संन्निध अक्षय
निरांजनीं मिणमिणतो आहे.
म्हणूं कशाला येइन जर मीं,
तुझीच केवळ झालें आहें;
काल-उद्यांना ओलांडुनि मी
आज होउनी आलें आहे !

• • •

# आज मी

प्राप्त झाल्या अद्‌भुताच्या
        आज मी भानांत नाहीं;
असुनिही अति निकट, तुझ्या
        आज मी ध्यानांत नाहीं.
यौवनाच्या आरतीच्या
        आज मी गजरांत नाहीं;
या वसंती वैभवाच्या
        आज मी बहरांत नाहीं.
वृष्टिच्या या पर्वकाळीं
        आज मी तृष्णेंत नाहीं;
संगमीं स्वप्नांचिया रे,
        आज मी निद्रेंत नाहीं.
जीवघेण्या कामनेच्या
        आज मी पाशांत नाहीं;
प्राप्त झाल्या अद्‌भुताच्या
        आज मी भानांत नाहीं.

• • •

# लग्नसराई

उष्टीं भांडीं खरडत बसल्या
मोलकरिणि या अर्ध्यापोटीं;
वणवणते मांडवांत त्यांची
आसुसलेली नजर चोरटी.

उजविकडे उतरंड थोरली
तवा-तपेल्या-पातेल्यांची,
डाविकडे ती चळथ उंचशी
निष्कलंक ताटावाट्यांची.

वाट्यांमधुनी रस अंब्याचा,
ताटांमधिं दहिभात नि भाज्या;
यजमानाच्या आतिथ्याच्या
खुणाच मागें उरल्या ताज्या.

पलिकडल्या खोलींतुनि उठती
हास्याच्या लाटांवर लाटा;
गलबल्यांत फोनोही उचली
फिरुनी फिरुनी अपुला वांटा.

आंत नववधू लाजत करिते
मुकीं खलबतें पतिराजांशीं !
मधुचंद्राला कुठें जायचें ?
निघावयाचें कुठल्या दिवशीं ?

समारंभ हा पाहत बसली
वडारणींची दारिं भुतावळ;
तिचिया कर्कश रडगाण्यांनीं
निघतें गर्जुन तें लग्नस्थळ.

नजर चोरटी--मुकीं खलबतें--
ते ढेकर--"वाढा हो माई !"
विसंवाद यांतला ऐकते
मिटल्या कानीं लग्नसराई !

● ● ●

# स्त्री माझें नांव

नव्या-जुन्या सीमेवर माझें मज स्थान दिसे;
संस्कृति मी जणुं समूर्त, स्त्री माझें नांव असे !
गृहिणी मी, कष्टतसें वृद्धांस्तव, बालांस्तव;
सुलभ मला पतिप्रेमा; दीनांचा मज आठव;
सदनाहुनि स्वर्ग फिका—हेंच स्वप्न पाहतसें !
शिक्षक मी, ज्ञानाची चिर मजला अभिलाषा;
अणुअणूस आकळतें बालमनाची आशा;
ध्येय हाच देव मला, अक्षय त्या पूजितसें !
मी विनम्र सेवक, जनिं सेवाव्रत चालवितें;
अश्रूंतुन हास्याचे शत अंकुर पालवितें;
कर्म हाच धर्म जगीं; तोच मला तारितसे !
कलावती मी, माझी नितनूतन अनुभूती;
सुंदरतापूजक मी, तीस्तव मम अभिव्यक्ती;
मी उन्मन, चिर अथांग रसरंगीं नाहतसें !
शास्त्रज्ञा, वाहत मी संशोधनकार्य धुरा
नारायणरूप शास्त्र देइल कधिकाळिं नरा ;
संजीवनिमंत्र तेच—ही श्रद्धा दाटतसे !
मी कांता, मी माता, शिक्षक मी, सेवक मी,
कलावती, शास्त्रज्ञा, विविधगुणीं नटतें मी;
विश्वाची मी प्रतिभा, मजमधिं समृद्धि वसे ;
संस्कृति मी जणुं समर्त, स्त्री माझें नांव असे !

● ● ●

# रेघ पुसटली

नक्षत्रांचे अन् चंद्राचे
नकोत मजला लाख दाखले;
हवी मला ती माती जीवर
माझें पहिलें स्वप्न रेखिलें.
जरि सर्वांचें निगूढ नातें
क्षणाक्षणाला मज जाणवतें,
त्या मातीच्या गंधास्वादा
तरिही माझें भान धांवतें.
माझ्या स्वप्नांवरला मोहर
कुजबुजतो ताऱ्यांच्या कानीं,
मुळें तयांचीं गुंतुन पडलीं
हिरवळलेल्या गंधित रानीं.
पाय भुईहून माझे ढळले,
आभाळाची सुटली दोरी,
स्वप्नाकृतिची रेघ पुसटली,
आली डोळ्यांवर अंधारी.
विनवुं कुणा मी आणि कशापरि
लेवविण्या मज तें माझेंपण,
ज्यावर केलें प्राणरसें मी
पहिल्या स्वप्नाचें आलेखन.

• • •

# भासच !

कुठें काय ?——कांहीं नाहीं.
तो ना ? तो तर होता
फटींतून आंत चुकलेला
प्रकाशाचा एक इवलासा भास !
त्यानेंच उठवलें का
निजलेल्या कळ्यांना ?
त्यानेंच खुलवलें का
जागलेल्या गळ्यांना ?
त्यानेंच नटवलें का
तळ्यांना——मळ्यांना ?
दिशांच्या पडद्यांमधून
त्यानेंच नादवला का
एक रेशमी आरोहावरोह ?
तोच असेल तो
इवलासा चुकार भास,
भासच !

• • •

## गंधधुंद मी

नव्हते केशहि तसे मोकळे
पदरहि नव्हता तसा भरारत
नव्हती कंठीं तान मधाची
पायीं नव्हती तसली विद्युत
नव्हते डोळे त्यापरि धुंडित
स्वप्न-वनांतील कस्तुरि-हरिणा
कधींच तो तर सरला विरला
संमोहाचा मदिर तराणा !--
सरला तो--तर आज कशानें
उरीं स्वरांचा स्पर्श जागला
अवकाशांतरिं गंध कुणाचा
कुणीं उचलिलें पुष्प-पावलां ?
--अधरावरि संकेत स्वरांचे
नयनांतरिं आभास अलौकिक
गंधधुंद मी भ्रमतें आहें
त्या चिरपरिचित स्वप्न-वनांतुन !

• • •

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
३९८३३ वि:
१५८६ नों: दि: ८/१२...

# बहाणा

स्वप्नामध्यें येसी तेव्हां
सुघेपणाचा करिसि बहाणा
जागेंपणिं कां पदोपदीं मग
घालित जासी खुळा उखाणा
'समांतरांना मीलन कुठलें'
हें मी वदतां मान तुकविसी
'संयोगाची वाट आपुली'
कां डोळ्यांनीं सांगत बससी
'जोपासत अपुलालें राहूं
पाहूं अवघ्यांमधें स्वरूपा'
हें मी वदतां—बिलगत पुससी
'स्वरूप एकच, मग अंतर कां'
मिटुनी जातें मम जागेंपण
ऐकुन असला लाख उखाणा
निजेंत पुनरपि वठूं लागतो
सुघेपणाचा तुझा बहाणा.

## यात्रा

कांहीं बोलावेंसें वाटें पण बोल उमटेना
मुकें रहावेंसें वाटे पण वाचा आटोपेना
कांहीं दवडावें वाटे त्याचा छंद आवरेना
कांहीं सांठवावें वाटे त्याचा आवर पडेना--

स्वप्न रचावें वाटतां डोळां नीज गवसेना
पहाऱ्याची वेळ येतां दृष्टी जागतां जागेना
कोणी चिरडाया येतां त्याची गती रोखवेना
कोणी पायदळीं जातां त्याची कींव करवेना--

ममतेचा अभिषेक मज उरीं झेलवेना
दुराव्याचा तीव्र ताप मज शिरीं घेववेना
जरा स्थिरावें वाटतां मज चाल मोडवेना
जरा उडावें वाटतां मज जड सोडवेना--

मज माझे ओळखेना मज कळ सोसवेना
उभ्या यात्रेमध्यें कोणी मज देव भेटवीना

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११९८५

# खेळ आपुला

खेळ आपुला दहा जणांचा
प्रौढ हंसें ओठांवर आणित
कुठें निघाला ? कुशल असेना ?
—विचारण्याचा
शतनजरांचा खडा पहारा
चुकवित अलगद निसटायाचा !

खेळ आपुला चार जणांचा
लौकिक दोघांहून वेगळ्या
परस्परांना ओळखण्याचा
ती ओळख अवचित नजरेंतुन
मनामनाला जाणवण्याचा
शतस्मृतींच्या चंद्रमण्यांनी
कणाकणांतुन पाझरण्याचा !

खेळ आपुला एकपणाचा
वियोगांतल्या संयोगाचा
खेळ आपुला
—असे नसेचा !

● ● ●

# दिसे ना दिसे

दिसे ना दिसे असें कांहिसें
तुझ्या नि माझ्यामधें आडवें;
सूत्र कुणाचें, कळ कोणा, तें
तुला जाणवे, मला जाणवे.
फुलांसारखे पथ्थर जमवुनि
उभविलीस ही रास कशाला ?
सुधेसारखें जहर मिळवुनी
भरिले हे मधुकोष कशाला ?
हळवा हळवा श्वास होउनी
कां माझ्या संचरसी देहीं ?
तिमिरावृत करितां मम प्राणां
तुला स्पर्शिते दया न कांहीं ?
ठावें तुज मी अशी भिंगरी,
माझ्या चरणां भ्रमणाची कळ;
तयांस असलें रेशिम लावुन
खर्चविलेंस कां रे माझें बळ ?

## भक्ति

अवघें राउळ, अवघ्या मर्ती,
भावच अवघा झाला भक्ती;
अवघ्या निःश्वसितांचीं सुमनें
अन् ओठावर गीतआरती !

• • •

## प्रीत हवी तर

प्रीत हवी तर वृथा कशाला पाळाया जनरीत हवी
प्रीत हवी तर दोन जिवांना अपुलाली नयनीत हवी
प्रीत हवी तर हवेत अश्रू, विरहाचा अंगार हवा
प्रीत हवी तर माथ्यावरतीं अभिन्नतेचा भार हवा
प्रीत हवी तर नेत्रांपुढतीं प्रलयघनांचें चित्र हवें
प्रीत हवी तर मनीं नि ध्यानीं निश्चल ध्रुवनक्षत्र हवें
प्रीत हवी तर भंवतीं हळवा संसाराचा व्याप हवा
प्रीत हवी तर त्या व्यापाला अलौकिकाचा शाप हवा
प्रीत हवी तर व्यथेव्यथेंतहि रसरंगाची साथ हवी
प्रीत हवी तर उरांत केवळ प्रीतीवरली प्रीत हवी

• • •

# जीवना रे

सत्य तुडवित पायीं दंभ मिरवित डोई
सख्य पुकारीत येऊं जीवना रे नको
ऊन्ह अडवित हातें पायीं पसरित कांटे
माझें म्हणवित येऊं जीवना रे नको
मायेविरहित मिठी तेजाविरहित दिठी
असे संगतीस राहूं जीवना रे नको
होतां विकल्प-वादळ उणावतां आत्मबळ
मज घृणेनें अव्हेरूं जीवना रे नको
अनावर आशयांत माझें झेंपावतां चित्त
मज व्यर्थांत खिळवूं जीवना रे नको
नको तृप्तींत गोठवूं नको स्मृतींत सांठवूं
मज मुठींत मिटवूं जीवना रे नको
तुझी प्रिया मी भाविक रहा होऊन प्रेमिक
खोटी जवळिक जोडूं जीवना रे नको

• • •

# मिटतां मिटतां

मिटतां मिटतां मिटतिल डोळे
वितळत जाइल भंवतीचें जग
मंदावत जातील ध्वनी, अन्
स्मरणामधली निवेल तगमग
निवान्त निर्मम घडीस असल्या
धांवुन येशिल कां मजजवळीं
उभ्याउभ्यानें स्पर्शशील मज
स्वप्नवेलिच्या नवपुष्पदलीं ?
अणूअणू मग होतिल डोळे
नीरव नेणिव बनेल वाणी
श्रवणापलिकडल्या कुंजांतून
निरुत्तराला फुटतिल गाणीं !

● ● ●

# मी चुकतें

मी चुकलें, चुकतें अन् चुकणारच वरचेवर !

मीं न कधीं वेलीचें अर्भकसें सुम खुडिलें
भावबहर ताऱ्यांचे मीं न कधीं मोजियले
मीं न धुंडिलें कधींच वाऱ्याचें कोठें घर !

पूजिला प्रकाश, तरी मीं न रात्र निंदियली
कृपणपणें गात्रगात्र मीं न व्यथा गोठविली
हास्यावर नच केला जनलज्जेचा प्रहार !

व्याधीपासून दूर, दूर कष्टचिंतेहुन
विश्व कांचनी सजलें, तेथें क्षण रेंगाळुन
गाऊं बघतें मनिंची छेडुनिया एकतार !

घरटें सोडून कधीं मी निळ्यांत रमलेली
उन्मन होऊन कधीं अपुल्यांतच भ्रमलेली
कधि नाचत सुटलेली नवख्या स्वरतालावर !

काळाच्या दरियावर लाट एक मी इवली
प्राणकळा ल्यालेली शून्याची मी पुतळी
पहुडाया बघतें पण शाश्वतिच्या अंकावर !

• • •

## कविता स्फुरते कशी—

कशी अचानक जनीं प्रकटते मनांतली उर्वशी
मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी
कुंभ रसांचे शिरीं घेउनी शब्दांच्या गौळणी
नजरेपुढतीं ठुमकत येती रूपवती कामिनी
हंसती रुसती विसावती कधिं तरंगती अंबरीं
स्वप्नसख्या त्या निजाकृतीचा वेध लाविती उरीं
त्यांच्या नादें करूं पाहते पदन्यास मी कशी
मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी
अवकाशावर धुंद उषेचें स्मित ओघळतें कसें
स्मितासवें त्या उन्मेषांचे बाग बहरती कसे
क्षितिजमंडलीं अथवा झुकते रजतपौर्णिमा कशी
मनोभाव न्हाणीत राहते शीतल ज्योत्स्नारसीं
अंतरबाहिर एकसुरावर घुमे सुरावर कशी
मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी
हें स्वरसुंदर जीवनमंदिर कुणीं कसें उभविलें
मी न कुणाला दावायाची शिलालेख आंतले
समयीमधली ज्योत अहर्निश भावभरें तेवते
तिच्या प्रकाशीं कुणापुढें मी हितगुज आलापिते
कशी नाचतें कीर्तनरंगीं हरपुन जाते कशी
मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी

• • •

# त्या क्षणीं आलास का ?

मी न माझी राहिलें तूं त्या क्षणीं आलास का ?
नेणतां माझ्या जिवाला स्पर्शुनी गेलास का ?
ऊन्ह पिवळें उमललेलें पांखरांनी प्राशिलेलें
डोलतां पानांफुलांनी रोमरोमीं हुंगिलेलें
केशपाशीं पीस त्याचें खोवुनी सजलास का ?
लाविली देवांगनांनीं ज्योत संध्यामंदिरीं
आरतीची झांज गेली अंबरा झंकारूनी
भर्जरी शेला स्वरांचा लेवुनी नटलास का ?
स्तिमित तुजला निरखितांना, घालितां करपाश देहीं
सर्वभावें आळवीतां सांकडें वाहून पायीं,
वाढत्या कोलाहलीं त्या मौन तूं झालास का ?
ज्ञानगंगा लोपली अन् भावमूल्यें फोल झालीं
आसुरी तृष्णा त्वरेनें जीवना ग्रासीत आली
होउनी तप्ताश्रु नेत्रीं मुक्त ओघळलास का ?
मी न माझी, तूं न तूझा आपुला हा सोहळा
वर्णितांना मुग्ध जेव्हां दाटुनी आला गळा
बावऱ्या ओठांतला उद्गार तूं बनलास का ?
मी न माझी राहिलें तूं त्या क्षणीं आलास का ?

• • •

# या वळणावर

ती नाहीं मी, ही मी दुसरी
उभी विसावत या वळणावरि !
रसरसणाऱ्या त्या हर्षोत्कट
जिनें उधळिल्या गीतलकेरी,
हेमंताच्या राजवटींतहि
जिनें निर्मिली सुगंधनगरी,
काजळकाळ्या क्षितिजकडांवर
जिनें रेखिली रेघ रुपेरी,
रसिकरंजनी, यौवनमुग्धा,
सचेतनाची जणुं ललकारी—
ती नाहीं मी—ही मी दुसरी !
पाहत जी आसावुन भंवतीं
लुप्त कुठें तो जुळलेला कर,
साद घालिते क्षणाक्षणाला
उमटविण्या खंडित प्रीतिस्वर;
उजळित जी स्वप्नांतच केवळ
चिंतियल्या ध्येयांचें गोपुर,
भग्नमनोरथ, वंचित, शापित,
आसमंत जाळित जळणारी—
ती नाहीं मी, ही मी दुसरी !

विसरुन गतकालाचें तांडव
विसावते जी या वळणावर
नयनांना दाखवीत कल्पित
भविष्यवेलीवरला मोहर,
प्रशांततेच्या उदरीं पाहत
खळखळणारा जीवननिर्झर,
त्या दोघींहुनि अशी निराळी,
चिरंतनाला अनुसरणारी,
ही मी दुसरी, या वळणावरि !

• • •

३९८३३ काव्य
१५४६ ८।१२।

# मी नसतें तर—

मी नसतें तर सुलासारखी
झाली असती तुझी कहाणी
घडोघडीं अन् आलें नसतें
आप्तेष्टांच्या डोळां पाणी
मी नसतें तर कुणी सोज्वळा
झाली असती तुझी स्वामिनी
रिझवित असती तुझ्या मनाला
तिची हिशेबी सुबोध वाणी
मी नसतें तर पाक घराला
आली असती कळा आगळी
कलाकुसरीच्या प्रदर्शनापरि
सजली असती बैठकखोली
मी नसतें तर घड्याळावरी
घटकापळ असतें रे झुललें
मी नसतें तर जनरूढीचे
घरांत असते पाठ चालले,
मी नसतें तर नसती वदळ
कवि, प्रकाशक, रसिकजनांची
श्रवणीं नसतें कवितागायन
कटकट वा यमक-प्रतिमांची
मी नसतें तर तुला लाभतें
स्वप्नमोकळें गृहस्थजीवन
मी नसतें तर संसाराचें
झालें नसतें असें रणांगण !

● ● ●

## कसें

कसें समजेल तुला
वात विझलेली नाहीं
तिची प्रकाशदानाची
प्यास बुझलेली नाहीं.
कसें समजेल तुला
पंख गळलेला नाहीं.
वाटा मावळल्या तरी
धीर ढळलेला नाहीं.
कसें समजेल तुला
नको--कशाला तें सारें
काळवेळ ओळखून
विझेल--जें विझणारें !

● ● ●

## हळू

हळु हंसेन बोलेन, हळ चरणीं चालेन
तुझें नवलाचें नांव हळु ओठांशीं जपेन.
हलकेंच सोडीन मी    माझा उतट निश्वास
उरीं हळु वागवीन    तुझ्या प्रीतीचा उल्हास
हळवेल्या गुपिताला    नको फुंकर घालूंस
फूल फुलेल अपाप    नको नजर लावूंस.

● ● ●

# किती

किती फुलावें फुलानें
सजवीत रंगरेष
कुणी पहातें तटस्थ
त्याचे गहिरे उन्मेष !

किती गंध उधळावा
सुरासुरांत निवैर
कुणी मौनानें मोडीत
त्याची तान सैरभैर !

किती झुरावें फुलानें
एका क्षणस्पर्शासाठीं
आहे स्नेहाचें कैवल्य
ज्याच्या दाटलेलें पोटीं !

● ● ●

## काय ?

काय पहावी जागून
पेंगणारी तमराशी
काय आरती दावावी
भंगलेल्या दैवतासी

काय शून्य उपसावें
निरर्थाच्या शिपल्यांनी
काय विराट विणावें
चार उभ्या आडव्यांनी

काय आपण होऊन
घ्यावा मागून नकार
काय फिरावें होऊन
उभ्या ओसाडीचा स्वार ?

● ● ●

## कुठें —

कुठें जायचा निर्दय पथ हा,
कसलें राउळ—प्रतिमा कसली ?
हा संभ्रम ;—तरि चरण थांबतां
उरांत कळ कां दुःसह उठली ?

● ● ●

## सख्या, पहांट जाहली —

सरत निशा, उजळ उषा, फिकट चंद्रसाउली
सख्या, पहांट जाहली

शीत, गंधरुचिर पवन मंदमंद वाहतो
कमलांना, कुसुमांना मृदुलकरें स्पर्शितो
कोटरांत विहगकुलें गुंफितीं स्वरावली
सख्या पहांट जाहली

मादक सुखसंभ्रमांत वृत्ति बावरी बने
वास्तवांत भानरहित स्वप्नगीत गुणगुणे
जागवि तिज तेज नवें किरणांच्या पाउलीं
सख्या पहांट जाहली

जागृत तन, जागृत मन, बघ जागें जनजीवन
नयनीं आनंद, मनीं नव-ध्येयांचें चिंतन
आवाहन करूं हरीस या जीवनमंगलीं
सख्या, पहांट जाहली

● ● ●

# एवढें गीत मला गाउं दे—

एवढें गीत मला गाउं दे
जनलोकाहुनि क्षणभर मजला
वेगळीच राहुं दे !—

सरसरली क्षण वळवाची सर
जलाशयावर तरंग नवथर
अवकाशांतुनि प्रसन्न सुंदर
मज वरवर जाउं दे !—

फुलाफुलांनीं, विहंगमांनीं
नादविली वासंतिक वाणी
त्या मनहारी स्वरवलयांनीं
अंकित मज होउं दे !—

होतां नजरानजर क्षणांची
जुळते प्रीती दोन मनांची
त्या प्रीतीच्या वीणेवरची
अंगुलि मज होउं दे !—

नादांमधुनी अनंत येथिल
नाद खुलूं दे एकच आंतिल,
जीवनांतुनी वास्तव, स्वप्निल,
माझें मज घेउं दे
एवढें गीत मला गाउं दे !—

• • •

## मी दिवाणी —

धुंदल्या संवेदनांनीं रंगली माझी कहाणी
मी दिवाणी मी दिवाणी

तोडुनियां बंध येथें बाल्य माझें वाहताहे
यौवनीं वार्धक्य वेडें डोकवूनी पाहताहे
कापुराची ज्योत झालें भूतभावीवर्तमानीं !
मी दिवाणी मी दिवाणी

जाहली मज मेघबाधा उरिं धरीं मी जीवनातें
नाचतें मयुरापरी नित मीच माझ्या स्वागतातें
सुंदराचें स्वप्न माझ्या पाहिलेलें लोचनांनीं
मी दिवाणी मी दिवाणी

वेदनेला स्पर्शितां मी आसवांचें दान देतें
स्नेहगाथा ऐकितां मी अर्पणाची साद देतें
मी चकोरी प्रेममग्ना, चंद्रवेडी रोमरोमीं
मी दिवाणी मी दिवाणी

• • •

# स्वप्नांत येउं का ?

सत्यांत नाहिं आलें
स्वप्नांत येउं का ?

विसरायचें तरीही स्मरणांत सांठलेलें
तें रूप राजबिंडें पाहून जाउं का ?

हृदयांत रंगलेलें लाजेंत गुंतलेलें
ओठांवरी उभें तें गाऊन जाउं का ?

हंसतां नभांत तारा हंसतां फुलांत वारा
प्राणांत हांसतें तें दावून जाउं का ?

तुझी म्हणून घ्यावें स्वप्नींच हें घडावें
ही आस सानुलीशी पुरवून घेउं कां ?

सत्यांत नाहिं आलें
स्वप्नांत येउं का ?

• • •

## विसरून जा, विसरून जा !

स्वप्नजीवन आपुलें
विसरून जा, विसरून जा !

कांहि हळवें, धीट कांही,
मूक कांही भाववाही
अंतरीं आकारलें—
विसरून जा, विसरून जा.

रंगवेडचा पाकळ्यांनीं
नादवीलें पानपानीं
गीत तें गंधांतलें—
विसरून जा, विसरून जा.

वांछिल्याविण लाभलेलें
प्रत्ययाविण जाणिलेलें
तें जगाहुनि वेगळें—
विसरून जा, विसरून जा.

● ● ●

# सोनियाचा पाळणा —

सोनियाचा पाळणा, रेशमाचा दोर ग
मधोमध विसावला माझा चित्तचोर ग
नीज नाहीं डोळां कसा टकमक पाहतो
बाळमुठी वरखालीं नाचवीत राहतो
याच्या चांदण्यांत माझे लोचन चकोर ग
सुगंधित जळानें हा न्हाणियला तान्हुला
आभूषणवसनांनीं सजविला सानुला
तीट काजळानें शोभे स्वरूपसुंदर ग
याच्या दर्शनानें येई सुखाला फुलोरा
याच्या स्पर्शनानें लाभे आशेला निवारा
प्रेमसूत्रें याच्या नाचे माझा मनमोर ग
वाडवडिलांची याच्या पाठिशीं पुण्याई
भाग्यशाली बाळ माझा आयुष्मंत होई
कुळकीर्ती उजळील असा सुकुमार ग
कुणी गाणें गुणगुणा, कुणी हालवा हिंदोल
झोपूं द्या ग राजीवाला, हीच विसाव्याची वेळ
धरा कृपादृष्टि याच्या शिरीं सानथोर ग
सोनियाचा पाळणा, रेशमाचा दोर ग

● ● ●

## काय म्हणतील बाई ?—

शाळेचं जर सारं नीट जमलं नाहीं
तर तूंच सांग मला काय म्हणतील बाई ?
अभ्यास पाहिलास दिलाय् केवढा नेमून
म्हणून तर इथें मी राहिलेंय् बसून
पाटीवर जर कांहीच लिहून नेलं नाही
तर तूंच सांग मला काय म्हणतील बाई ?

झग्याची शाई तर जशीच्या तशी
नवा परकर पोलकाच नेसून जातें कशी
वर्गांत जर मी चलाख दिसलें नाही
तर तूंच सांग मला काय म्हणतील बाई ?

काम तरी आतां सांगूं नकोस गडे
वाढलेलं ताटच आणून ठेव पुढें
जाण्याची जर अशी घाई केली नाही
तर तूंच सांग मला काय म्हणतील बाई ?

आई, तूं शाळेंत जात होतीस ना
बाईची लाडकी झाली होतीस ना
तुझ्यासारखी मी जर शहाणी झालें नाही
तर तूंच सांग मला काय म्हणतील बाई ?

• • •

# अशीच एकदां

अशीच एकदां तुझ्यासारखी
लिहीन आई ! मीही कविता,
अशीच तीही मासिकामधें
छापुन येइल बघतां बघतां !
असेच आई लोकहि येतिल
काव्यगायना बोलविण्या मज
असाच देतिल गुच्छ थोरला
कलाबतूची ज्याला झगमग.
मोठी झाल्यावरी एकदां
असेंच पुस्तक छापुन आणिन,
छान त्यांतल्या कविता सगळ्या
शिकविन मी तुज " बाई " होउन !

• • •

# ढग आले

आई, बघ आकाशांत ढग आले काळे काळे
कुणी अस्वलाएवढे–कुणी हत्तीएवढाले.
उन्हाळ्यांत कां ग त्यांना होतें ठेविलें कोंडून ?
कहूकडून हे आले दरवाजे कां फोडून ?
आई, एक आवाज हा येतो ढोल–नगाऱ्याचा,
आभाळांत माजेल कां धुमाकूळ लढाईचा ?
चंद्रसूर्यांना हे सारे टाकितील कां मारून ?
आई, मग पडायचें कसें चांदणें नि ऊन्ह ?

• • •

# कांहि तरी दे ना!

आइ ! मला खेळाया कांहिंतरी दे ना !
कर म्हणसी भातुकली बोळकिं तरि दे सगळीं
पोह्यांवर इवलासा गूळ तरी दे ना !
काढ म्हणसि चित्र मला दे तर खडू आणि फळा
छाप उठविण्यास जरा पीठ तरी दे ना !
गा म्हणसी सुंदरसें गाणें तूं म्हणसि तसें
म्हणतांना पेटीचा सूर तरी दे ना !
शिवणाचा देसि धडा दे तरि सुंदर कपडा
सुइदोरा आणि जरा कातर तरि दे ना !
जाऊं कां फिरत दूर ? लागे मज ऊन्ह फार
नसले तर बूट नको, छत्रि तरी दे ना !
कांहिं न मज ये करितां रागवूं नकोस अतां
घडिभर मज लोळण्यास मांडि तरी दे ना !
आइ ! मला खेळाया कांहिं तरी दे ना !

• • •

## रडगाणें

कपाट माईचें उघडोनी
दौत बबीनें उपडी केली,
गडद निळया रंगांत ताइची
साडी झटपट रंगुन गेली.
हाणामारी, झोंबाझोंबी
तिथें जुंपली, आली आई
कुणा धपाटा कुणा चापटी
कुणास धम्मकलाडू देई.
एकच हलकल्लोळ उडाला
छान रंगलें मग रडगाणें
ऐकायाला दारापुढती
गल्लीमधले उभे शहाणे !

● ● ●

## खोटें खोटें

खोटें खोटें रडूं या मोठ्ठा गळा काढूं या
खेळ टाकूं मोडून बैठक टाकूं फाडून
जाऊं दूर काढूं सूर
म्हणूं–बाबा–आई–आई
भाऊ–दादा–ताई–ताई
जमतिल सारे, म्हणतिल "या रे"
घेतिल आम्हां मांडीवर, देतिल खाऊ खंडीभर !

● ● ●

# आई, तुला दाखवूं का — ?

आई, तुला दाखवूं का बाबा होऊन ?
खुर्चीवर बसतों, दे चहा आणून.
आई, तुला दाखवूं का भाऊ होऊन ?
देई पैसे, आत्तां देतों भाजी आणून ?
आई, तुला दाखवूं का ताई होऊन ?
दाणे, गूळ देई, घेतों खेळ मांडून.
आई, तुला दाखवूं का आजी होऊन ?
नैवेद्याला ठेव, देतों पूजा करून.
आई, तुला दाखवूं का बाळ होऊन ?
घाल बरें मांडी, घेतों जरा लोळून !

• • •

...ाळा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38833 वि: काव्य
क्रमांक 9456 नों: दि: 8/12/69

## बरं का ग आई —

तूं आहेस बेबी, मी आहे आई
बरं का ग आई, हें विसरायचं नाही !
सकाळ होतांच मी तुला उठवीन
मीच तुझे दांत घांसून देईन
दुधाचा पेला पाहून रडायचं नाही !
अभ्यास झटपट करून घ्यायचा
देईन तो झगा घालून घ्यायचा
शाळेला जातांना रुसायचं नाही !
बाबा आणि मी फिरायला जाऊं
ताईजवळ तुला खेळायला ठेवूं
दोघांनी मुळींच भांडायचं नाहीं !
शुभं करोति, पावकी नि पाढे
म्हणून दाखवायचे नेमानें तेवढे
पाढ्यांवांचून तूं जेवायचं नाहीं !
झोपतांना मात्र तूं आई व्हायचं
अंगाई म्हणत थोपटत राह्यचं
दुपारचं कांहीं आठवायचं नाहीं,
बरं का ग आई,
हें विसरायचं नाहीं !

• • •

# उमललीं ताराफुलें

नील आकाशांत नाथा उमललीं ताराफुलें !
धुंद माझ्या लोचनांनीं बहर त्यांचा वेंचिला
अंगअंगीं हार त्यांचे माळुनी मीं घेतले
त्या फुलांनीं जागवील्या मागल्या साऱ्या स्मृती
उग्रता गली दिसाची, शांत झालीं वादळें !
गायिलीं मी गूढ गाणीं, मूक स्वप्नें ऐकिलीं,
नाचलें मी, हांसलें मी, आंसवांनीं नाहलें !
हर्षखेदाचे उमाळे आज झाले मोकळे
परिमळा मी, भान माझें अंबरीं झेंपावलें,
नील आकाशांत नाथा उमललीं ताराफुलें !

● ● ●

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 38833 वि: 0b1c4
क्रमांक 1586 नों. दि. 8/12/69

REFBK C011985
REFBK-0011985

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 91869
स्थापना १८९३